# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ३१.३.२००६ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.३२) इतिवृत्त**

शुक्रवार दिनांक ३१ मार्च २००६ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे सकाळी ९.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
(०५) सौ. जधव संगिता विठ्ठलराव
(०६) श्री. जेज्रुकर संतोष सुधाकर
(०७) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०९) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(१०) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(११) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१२) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१३) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१४) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१५) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : सर्वांना गुढीपाडव्याच्या व नवीन वर्षाच्या शुभेच्छा.

श्री.विनायक पांडे : श्वानदंश प्रतिबंधक लस खरेदी प्रकरणी मी विचारणा केली होती. या संदर्भातील निविदा झालेल्या आहेत किंवा नाही, व श्वानदंश प्रतिबंधक लस खरेदी केलेली आहे किंवा नाही? याची माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी माहिती द्यावी.

प्र.आ.वैद्य.अधिकारी : श्वानदंश प्रतिबंधक लस शासन मजूर दरावर (RC) उपलब्ध आहे. कंपनीला पुरवठ्याचे आदेश दिलेले आहेत. एक आठवड्यात पुरवठा होणे अपेक्षित आहे. एक महिन्याचा साठा मागविलेला आहे. १२०० लसींचा पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहेत.

मा. सभापती : ६ लाखाचे अनुदान व्यपगत झाले आहे.

प्र.आ.वैद्य.अधिकारी : सदरची रक्कम व्यपगत झालेली नाही. त्यातून खरेदी केलेली आहे.

मा. सभापती : ६ लक्ष खर्च करून १२०० लसी घेण्यात येणार आहेत त्यापैकी ४० टक्के घाटी रूग्णालयात व उर्वरीत ६०% विविध ६ प्रभाग कार्यालयाच्या कार्यकक्षेत असलेल्या आरोग्य केंद्रात उपलब्ध करून देणार. १५ दिवसात महानगरपालिकेला येतील. या संदर्भात आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी नोंद घ्यावी.

श्री.रविकांत गवळी : सर्वांना नववर्षाच्या व गुढीपाडव्याच्या शुभेच्छा. दोन दिवसांपुर्वीच सभेत प्रश्न उपस्थित झाला व दोन दिवसात निर्णय त्याबद्दल अभिनंदन. एका प्रश्नाची चौकशी शासनापर्यंत पोहोचली. अहवाल देणार होते.

श्री.संतोष जेजुरकर : मी ५ बैठकांना हजर होतो. चौकशी शिवाय काही नाही. आपण फक्त चौकशीच करतो का? किती चौकशा चालू आहेत.

श्री.शशांक विसपुते : स्थायी समितीने ज्या ज्या चौकशीचे आदेश दिलेले आहेत ते निकाली लागले आहेत. पन्नालालनगरचा अहवाल आलेला आहे किंवा नाही?

श्री.मुजीब खान : गारखेडा भूखंड चौकशीच्या संदर्भात दोषी अधिकारी कर्मचारी अद्यापही खुर्च्यावर बसलेले आहेत. समर्थनगर जुने रेखांकनाचे अभिलेख, मुळ नकाशे संचिकेतून गहाळ झाले आहेत. यास देखील आमच्या लोकांनी साथ दिलेली आहे. सहा महिन्यापुर्वीचा नकाशा कुठे गेला. सहा महिन्यापुर्वी एका व्यक्तीस प्रत दिलेली आहे. श्री.मुळे साहेब आले त्यांच्यासमोर ठेवली त्यात नकाशा नाही. सर्वात मोठा घोटाळा करण्यासाठी ते नेलेले दिसते. नगर रचना विभागाची संचिका मागवून पहावे. दोषी अधिकारी स्थायी समितीच्या सभेत बसलेले आहेत.

मा. सभापती : जे जे चौकशीचे आदेश दिले त्याचा निकाल लागलेला आहे. या स्थायी समितीने घेतलेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी व्हावी. चौकशीअंती तथ्य सापडले आहे. कुणास त्रास देण्यासाठी चौकशी केलेली नाही. स.सदस्या सौ.लता दलाल यांनी समर्थनगर येथील चटईक्षेत्र निर्देशांकासंबंधी केलेल्या सूचनांची सर्वांनी दखल घेतली. प्रशासनाने कोणसही पाठीशी घातलेले नाही.

स.संचालक न.र. : मुख्य लेखा परिक्षकांकडून चौकशी चालू आहे, ते अहवाल देतील. समर्थनगर ले-आऊट ही जुनी संचिका आहे. मुळ प्रत मी येण्यापासून नव्हती. एका उप अभियंताच्या सहीची सत्यप्रत आहे,त्यावरून सत्यप्रत दिली आहे. त्या सत्यप्रतीवर माझा विश्वास नाही म्हणून दिली नाही.

श्री.मुजीब खान : विश्वास दोन ठिकाणी कसे आहे. एकाला प्रत दिली जाते त्यावेळी विश्वास आहे व श्री.मुळे यांना देतांना त्यावर विश्वास नाही.

मा. आयुक्त : ज्यांनी सत्यप्रतीवर सह्या केलेल्या आहे त्यांच्या जबाबदारीवर द्यावे.

श्री.मुजीब खान : मुळ नकाशे न्यायालयात आहेत. विकासक संचिका घरी घेऊन जातात, तेथे निर्णय होतात. हे सर्वात जुने ले-आऊट आहे.

मा. आयुक्त : सुधारीत बांधकाम परवानगी आली तर अभिलेख कक्षामध्ये नगर रचना विभागासाठी स्वतंत्र अभिलेख कक्ष ठेवावे.

श्री. मुजीब खान : सदर नोंद रजिस्टर बाहेर नेऊन फाडले. तीन लोकांनी नेऊन फाडले. दिवसभर अभिलेख कक्षामध्ये शिपाई असतो. मुळ अभिलेख कोणाकडे, कुठे व कोणत्या तारखेला गेले? न्यायालयात जाण्यापुर्वी नकाशे गेलेले आहेत. मा.न्यायालयाने मागवलेले आहे. संचिका घरी जातात.

मा. सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना श्री.एम.डी.राठोड यांना सूचना देण्यात येते की, जुने रेखांकनाच्या संचिकांचे संपूर्ण दफ्तर अभिलेख कक्षात जमा करावे. मा.आयुक्तांच्या मान्यतेशिवाय देऊ नये. मा.आयुक्तांची परवानगी घेऊनच द्यावे. संगणकीकरणावर भर द्यावा. समर्थनगर येथील प्रकरणात उप अभियंता यांच्या जबाबदारीवर नावाचा उल्लेख करून ग्राह्य धरण्यात यावे. अभिलेख अद्ययावत करण्यात यावे.

सहा.सं.नगर रचना : स.सदस्यांनी जे आरोप केलेले आहे त्या संदर्भात पुरावा द्यावा, मी खुलासा करण्यास तयार आहे.

मा. सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना यांना सूचना देण्यात येते की, आपल्या अधिकारात जे कामकाज चालते ते कामकाज आपल्या अधिकारातच करावे. नियमास अधीन राहून करावे. स.सदस्यांनी सिध्द करायचे का? आपण शासकीय नोकरी करता हे विसरता कामा नये. चौकशीत जे निष्पन्न होईल ते मान्य करावे लागेल. या प्रकरणात संपूर्ण अभिलेख व आपले मत लेखी स्वरूपात आपल्या अभिप्रायासह मा.आयुक्त व माझ्याकडे सादर करावे. आवश्यक ती नोंद घेऊन अहवाल शासनास पाठविण्यात येईल. पन्नालालनगरचा अहवाल लिखाणात आहे.

मुख्य लेखा परिक्षक : पन्नालालनगर प्रकरणाचा प्राथमिक अहवाल तयार झालेला आहे. दुपारपर्यंत सादर करण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : ११२४ पदांच्या भरतीसंबंधीचा चौकशी अहवाल देणार होते, तो पूर्ण झाला किंवा नाही याचा खुलासा देण्यात यावा.

कर निर्धा. व संकलक : ११२४ मजुरांच्या भरतीसंबंधी चौकशीच्या प्राथमिक अहवालाचे काम चालू आहे. लवकरच देण्यात येईल. प्राथमिक अहवालात असे आढळून आले आहे की, मा.उच्च न्यायालयाच्या सेवाजेष्ठता यादीत नाव नसताना काहींना नियुक्त्या देण्यात आल्या. तसेच अगोदर कार्यरत असलेले कर्मचारी यांना न घेता त्यांचे नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना घेण्यात आले आहे. सेवाजेष्ठता यादीनुसार घेतलेले नाही. काही बदल करावयाचा झाल्यास मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही. ही बाब नियमाला धरून नाही, असे निदर्शनास आलेले आहे.

श्री.मुजीब खान : ११२४ कर्मचाऱ्यांच्या भरतीमध्ये २०-२२ लोकांवर अन्याय झालेला आहे. जे जेष्ठता यादीत नव्हते त्यांना घेतलेले आहे व जे इमानदारीने काम करीत होते त्यांना वगळले. त्यांचेकडे सर्व कागदपत्रे आहेत. याबाबत मा.आयुक्तांनी तपासणी करून त्यांना न्याय द्यावा. तसेच काहीना ऑर्डर देवून परत घेण्यात आल्या त्यांचेवर देखील अन्याय झाला आहे.

मा. सभापती : ११२४ कर्मचारी भरतीमध्ये काही कर्मचारी नियमानुसार सेवेत समावेश होणे आवश्यक होते परंतु त्यांना डावलण्यात आले आहे. त्यांना आदेश देवून परत घेण्यात आले. जोपर्यंत चौकशी अहवाल येत नाही तोपर्यंत काही कारवाई करता येणे शक्य नाही.

मा. आयुक्त : ज्यांना कामावर घेतले होते त्यांचे ऑर्डर परत घेतल्या याबाबत चौकशी होईल. एक महिना लागेल. अंतिम चौकशी अहवाल येईल.

श्री.रविकांत गवळी : ज्येष्ठ सदस्यांची नियुक्ती करावी.

मा. सभापती : जो प्राथमिक अहवाल दिला त्यात अनेक त्रृटी आढळून येत आहेत. लेखा विभागाकडून वेतन देण्यात आले त्याची नोंद अहवालात नाही. तसेच ही प्रशासकीय बाब असल्यामुळे सदस्यांची कमिटीत सदस्य म्हणून निवड करता येणार नाही. जे दोषी असतील त्यांचेवर मा.आयुक्त कारवाई करतील. जी रिक्त पदे आहेत त्यास शासनाने मान्यता दिलेली आहे, अशा पदावर दैनिक वेतनावरील कार्यरत कम्रचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार घेण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी : शहराला पाणी लागणार असून हर्सूल तलावातील गाळ काढण्यात यावा. त्यासाठी निविदा काढाव्या. यामुळे मनपाचे उत्पन्न वाढेल.

श्री.कंवरसिंग बैनाडे : कुणीही व्यक्ती पैसे देऊन माती घेऊन जाणार नाही. मोफत देण्यात यावे.

मा. सभापती : उप आयुक्त (म) यानी योग्य ती कार्यवाही करावी. शहराला जास्तीत जास्त पाणी पुरवठा कसा करता येईल यासाठी प्रयत्न करावेत. विषय क्र.३०५ -३०८ मंजूर.

**विषय क्र.३०५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, घाटी चौक ते मकाई गेट पर्यंतच्या रस्त्यासाठी फुटपाथ तयार करणे. या कामाचे अंदाजपत्रक रू.१३,३५,३७०/- चे असुन या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण ५ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | राहुल आर.दाशरथे | २७.०९% कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १९.५% कमी दराने |
| ३. | शहा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| ४. | मुबारक एम.पठाण | २.५ % जस्त दराने |
| ५. | आर.बी.रूडसमुद्र | १५.००% जस्त दराने |

तुलनात्मकरित्या सर्वात कमी दराची निविदा श्री.राहूल आर.दाशरथे यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०९ % कमी दराने आहे. तरी श्री.राहूल आर.दाशरथे यांची निविदा मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी चौक ते मकाई गेट पर्यंतच्या रस्त्यासाठी फुटपाथ तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २७.०९% कमी दराची श्री.राहूल आर.दाशरथे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.अ ते प्रभाग क्र.फ अंतर्गत विविध रस्त्यांवर फुटपाथ तयार करणे. या कामाचे अंदाजपत्रक रू.१९,९९,१०७/- चे असुन या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण ६ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.बालाजी भास्करे | ३४.००% कमी दराने |
| २. | मे.अमन असोसिएट | २५.२७% कमी दराने |
| ३. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २५.००% कमी दराने |
| ४. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | २३.७८६% कमी दराने |
| ५. | मे.महिमम कन्स्ट्रक्शन | २३.००% कमी दराने |
| ६. | आर.बी.रूडसमुद्र | २२.२१% कमी दराने |

तुलनात्मकरित्या सर्वात कमी दराची निविदा श्री.बालाजी भास्करे यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.०० % कमी दराने आहे. तरी श्री.बालाजी भास्कटे यांची निविदा मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.-अ ते प्रभाग क्र.-फ अंतर्गत विविध रस्त्यांवर फुटपाथ तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३४% कमी दराची श्री.बालाजी भास्करे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०७ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको हा नवीन विभाग दिनांक ०१ एप्रिल २००६ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत आहे. मलेरिया विभागतर्फे किटकनाशक व अळीनाशक औषध फवारणी व फॉगींग (प्रभाग निहाय) सेवा दिनांक ०१.०४.२००६ पासून द्यावयाची आहे.

सध्या महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले कर्मचारी सिडको विभागासाठील अपुरे पडणर आहेत. त्यामुळे सिडको विभागासाठी किटकनाशक व अळीनाशक औषध फवारणी व फॉगींग धुरीकरणासाठी खाजगी कंत्राटदाराकडून करून घेण्याचा प्रशासनामार्फत निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत दिनांक ०४ मार्च २००६ रोजी स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रामधून सिडको विभागासाठी विकेंद्रीभूत किटकनाशक व अळीनाशक औषध फवारणी व फॉगींग धुरीकरण कामाकरीता निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. दिनांक ६.३.२००६ ते दि.१७.३.२००६ या कालावधीत निविदा विक्री करण्यात आली. तसेच दि.१८.३.२००६ रोजी निविदा स्विकृत करण्यात आली. यासाठी एकूण ५४ निविदांची विक्री झाली व २५ निविदा भरलेले अर्जप्राप्त झालेले आहेत. यापैकी ०२ निविदा अर्जअपात्र ठरविण्यात आलेले आहेत.

शहरामध्ये आरोग्यदायी आणि पर्यावरण सदृश्य सेवेसाठी तसेच सोप्या आणि जलद नियंत्रणासाठी किटकनाशक व अळीनाशक औषध फवारणी व फॉगींगकरीता विकेंद्रीकरण करून सिडको विभागाचे ६ प्राग करण्यात आलेले आहेत.

| प्रभाग क्रमांक | सर्वात कमी दर असलेले कंत्राटदाराचे नांव व प्रतिमाह रक्कम | |
|---|---|---|
| १ | मे.रामदास पेस्ट कंट्रोल | रू.६३,९७५/- |
| २ | मे. विराट पेस्ट कंट्रोल | रू.६३,१६९/- |
| ३ | मे.आर.डी.पेस्ट कंट्रोल | रू.६३,७७३/- |
| ४ | मे. पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | रू.६३,६८०/- |
| ५ | मे. निलेश लेबर सप्लायर्स | रू.६३,५५२/- |
| ६ | मे. सचिन पेस्ट कंट्रोल | रू.६३,८०१/- |

वरील प्रभाग निहाय प्राप्त निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आहेत. करीता त्यांचेकडून सदर काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको हा नवीन विभाग दिनांक ०१ एप्रिल २००६ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत असल्याने मलेरिया विभागतर्फे किटकनाशक व अळीनाशक औषध फवारणी व फॉगींग (प्रभाग निहाय) सेवा पुरविण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी पुढे दर्शविण्यात आलेल्या प्रभाग निहाय कमी दराच्या निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| प्रभाग क्रमांक | सर्वात कमी दर असलेले कंत्राटदाराचे नांव व प्रतिमाह रक्कम | |
|---|---|---|
| १ | मे.रामदास पेस्ट कंट्रोल | रू.६३,९७५/- |
| २ | मे. विराट पेस्ट कंट्रोल | रू.६३,१६९/- |
| ३ | मे.आर.डी.पेस्ट कंट्रोल | रू.६३,७७३/- |
| ४ | मे. पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | रू.६३,६८०/- |
| ५ | मे. निलेश लेबर सप्लायर्स | रू.६३,५५२/- |
| ६ | मे. सचिन पेस्ट कंट्रोल | रू.६३,८०१/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०८ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको हा नवीन विभाग दिनांक ०१ एप्रिल २००६ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत आहे. या विभागाच्या साफसफाईची सेवा महानगरपालिकेस दिनांक १ एप्रिल२००६ पासून द्यावयाची आहे. सध्या महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले स्वच्छता कर्मचरी, कचरा उचलण्याची वाहने सिडको विभागासाठी अपुरी पडणार आहेत. त्यामुळे सिडको विभागाचे रस्ते झाडलोट व साफसफाई खाजगी कंत्राटदाराकडून करून घेण्याचा प्रशासनामार्फत निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत दिनांक ६ मार्च २००६ रोजे स्थानिक व राज्यस्तरावरील वर्तमान पत्रामधून सिडको विभागासाठी विकेंद्रीभूत घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रभाग निहाय साफसफाई कामाकरीता निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दिनांक ६.३.२००६ ते १८.३.२००६ या कालावधीत निविदा विक्री करण्यात आल्या. तसेच दि.१८.३.२००६ रोजे निविदा स्विकृत करण्यात आल्या. यासाठी एकूण ९८ निविदांची विक्री झाली व ५८ निविदा भरलेले अर्ज प्राप्त झाले. यापैकी ०९ निविदा अर्ज अपात्र ठरविण्यात आले.

सिडको विभागात सध्या दररोज६० मेट्रीक टन कचरा तयार होतो. शहरामध्ये आरोग्य दायी आणि पर्यावरण सदृश्य सेवेसाठी तसेच सोप्या आणि जलद नियंत्रणासाठी घनकचरा व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करून सिडको विभागाचे १० प्रभाग करण्यात आले आहेत.

**नियोजनाचे ठळक वैशिष्ट्ये :**

१. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना तसेच घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० ची अंमलबजवणी
२. आठवड्याचे ७ दिवस तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी झाडलोट व साफसफाई चे काम सुरू राहणार.
३. व्ही.आय.पी.रस्ते व मुख्य रस्ते यांची रात्रपाळीत झाडलोट व साफसफाई व दिवसा त्या रस्त्याची स्वच्छतेसाठी देखभाल.
४. १ मे २००६ पासून १००% घरामधून ओला व सुका कचरा गोळा करणे.

**कामाचे स्वरूप :**

हैद्राबाद महानगरपालिका पॅटर्ननुसार स्वच्छतेच्या कामाचे खालील प्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.

**(१) प्रभाग निहाय स्वच्छतेचे काम :**

अ) १५ ते ३० मीटर रूंदीचे मुख्य रस्ते, व्ही.आय.पी.रस्ते रात्रपाळीत झाडणे व स्वच्छ करणे. वेळ रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत.

ब) प्रभाग निहाय रात्रपाळीत स्वच्छ केलेले मुख्य व व्ही.आय.पी.रस्त्याची स्वच्छता दिवसपाळीत टिकवून ठेवणे. वेळ सकाळी ६ ते ३ वाजेपर्यंत.

क) प्रभाग निहाय अंतर्गत रस्ते, छोटे रस्ते यांची दिवसपाळीत झाडलोट व सफाई करणे. वेळ सकाळी ६ ते दुपारी ३ वाजेपर्यंत.

**(२) प्रभाग निहाय कचरा उचलून वाहून नेण्याचे काम :**

प्रभाग निहाय कचरा कुंड्या, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, उघड्या जगा येथील घनकचरा उचलून मनपाच्या कचरापट्टीवर नेणे. तसेच यामध्ये १ मीटर रूंदीचे नाला सफाई सुध्दा समाविष्ट आहे.

प्रत्येक प्रभागामध्ये सफाई मजूर व कचरा उचलणाऱ्यावाहनाची संख्या मा.उच्च न्यायालय व घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० यानुसार पुर्वनिश्चित करण्यात आलेले आहे. कामाच्या अटी व शर्ती या दोन्ही नियमांच्या अधिन राहून तयार करण्यात आलेल्या आहेत. रस्त्यांची झाडलोट व साफसफाई तसेच कचरा उचलण्याचे काम आठवड्याचे सातही दिवस तसेच सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी सुध्दा चालू राहणार आहे. स्वच्छतेसाठी लागणारे सर्व साहित्य व जंतूनाशके पावडर स्वत: कंत्राटदाराने खरेदी करावयाची आहे.

दिनांक १ मे २००६ पासून घरामधून ओला व सुका कचरा असे वर्गीकरण केलेला कचरा १०० टक्के गोळा करण्याची अट संबंधीत कंत्राटदारास टाकण्यात आलेली आहे. सदरील नियोजन सिडको कार्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीवर आधारित आहे. त्यामुळे व आवश्यकतेनुसार स्वच्छता कर्मचारी व वाहने कमी किंवा जस्त करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी राखून ठेवले आहेत.

या खाजगी कंत्राटदाराच्या कामावर स्वत: कंत्राटदार, मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख तथा वैद्यकीय अधिकारी, सिडको प्रभाग अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांचे नियंत्रण राहील.

प्रत्येक प्रभागात वाहनाची व मजूराची संख्या निश्चित असल्याने प्रत्येक प्रभागाची किंमत निश्चित आहे. कंत्राटदाराने फक्त त्यांच्या मेहेनतान्याची बोली लावलेली आहे. ही सेवा प्रदान करणाऱ्या खाजगी कंत्राटदारास त्यांना नेमणूक दिलेले काम १०० टक्के पुर्ण झाल्यानंतर व महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या विशिष्ट पध्दतीने मुल्यमापन झाल्यानंतर अदा करण्यात येणार आहे. यामुळे सिडको विभागात संपूर्ण स्वच्छता पाळली जईल आणि त्यायोगे नागरिकांना संपूर्ण आरोग्याचा लाभ होईल. तसेच छोट्या खाजगी संस्था, शहरातील गरीबांना रोजगार मिळण्यास प्रोत्साहन मिळेल व कार्यक्षमतेवरील आधारीत नियंत्रण प्रणालीतून कार्यभाग साधला जईल.

खाजगी कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास रू.५००/-(रूपये पाचशे फक्त) दंडाची कार्यवाही प्रतिदिन निश्चित करण्यात आलेली आहे व मजूरांची संख्या अपेक्षेपेक्षा कमी आढळल्यास रू.२००/- प्रति मजूर प्रतिदिन अशी ठेवण्यात आलेली आहे.

प्रभाग निहाय तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी बोली लावलेली प्रभाग निहाय तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| प्रभाग क्रमांक | एकूण स्वच्छता मजूरांची संख्या | ट्रॅक्टरची संख्या | प्रभागाची किंमत रूपये (प्रतिमाह) | प्राप्त झालेल्या एकूण निविदा | अपात्र ठरवलेल्या निविदा | मायनसमध्ये गेलेल्या निविदामुळे अपात्र ठरलेल्या निविदा | बोली न भरल्यामुळे अपात्र | पात्र निविदा | पात्र ठरलेल्या निविदापैकी सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदाराचे नांव व बोली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** |
| १ | २९ | ०२ | ११८८५० | ०६ | ०२ | -- | -- | ०४ | **के.एम.सुरे (रू.५०९४२)** |
| २ | २९ | ०२ | ११८५८० | १२ | ०२ | ०२ | -- | ०८ | **अनिकेत कन्स्ट्रक्शन (रू.४८१८२)** |
| ३ | ३७ | ०२ | १४४०५० | ०९ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | **व्हि.जी.स्वामी (रू.५३५६९)** |
| ४ | ३५ | ०२ | १३७७५० | ०६ | ०१ | ०१ | -- | ०४ | **परफेक्ट हॉ.किपींग (रू.५१०२९)** |
| ५ | ३१ | ०२ | १२५१५० | ०४ | ०२ | -- | -- | ०२ | **व्हि.जी.स्वामी (रू.४७७७४)** |
| ६ | २२ | ०२ | ९६८०० | ०५ | ०१ | -- | -- | ०४ | **मोना लेबर (रू.३२८०८)** |
| ७ | २० | ०२ | ९०५०० | ०३ | -- | -- | -- | ०३ | **मोना लेबर (रू.३५९७१)** |
| ८ | २४ | ०२ | १०३१०० | ०४ | -- | -- | -- | ०४ | **ईश्वरलाल खरे (रू.३४८७१)** |
| ९ | २९ | ०१ | १०६३५० | ०४ | -- | -- | -- | ०४ | **के.एम.सुरे (रू.४३८९५)** |
| १० | २० | ०१ | १०९५०० | ०५ | -- | ०१ | -- | ०४ | **निलेश लेबर (रू.३७३९२)** |
| | **२७६** | **१८** | **११५०९००** | **५८** | **०९** | **०५** | **०१** | **४३** | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको हा नवीन विभाग दिनांक ०१ एप्रिल २००६ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत असल्याने सिडको विभागासाठी विकेंद्रीभूत घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रभाग निहाय साफसफाई कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी पुढे दर्शविण्यात आलेल्या प्रभाग निहाय कमी दराच्या निविदा स्विकारणेस व त्यांचे नांवापुढील बोली रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.


| प्रभाग क्रमांक | एकूण स्वच्छता मजूरांची संख्या | ट्रॅक्टरची संख्या | प्रभागाची किंमत रूपये (प्रतिमाह) | प्राप्त झालेल्या एकूण निविदा | अपात्र ठरवलेल्या निविदा | मायनसमध्ये गेलेल्या निविदामुळे अपात्र ठरलेल्या निविदा | बोली न भरल्यामुळे अपात्र | पात्र निविदा | पात्र ठरलेल्या निविदापैकी सर्वात कमी बोली लावलेल्या कंत्राटदाराचे नांव व बोली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** |
| १ | २९ | ०२ | ११८८५० | ०६ | ०२ | -- | -- | ०४ | **के.एम.सुरे (रू.५०९४२)** |
| २ | २९ | ०२ | ११८५८० | १२ | ०२ | ०२ | -- | ०८ | **अनिकेत कन्स्ट्रक्शन (रू.४८१८२)** |
| ३ | ३७ | ०२ | १४४०५० | ०९ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | **व्हि.जी.स्वामी (रू.५३५६९)** |
| ४ | ३५ | ०२ | १३७७५० | ०६ | ०१ | ०१ | -- | ०४ | **परफेक्ट हॉ.किपींग (रू.५१०२९)** |
| ५ | ३१ | ०२ | १२५१५० | ०४ | ०२ | -- | -- | ०२ | **व्हि.जी.स्वामी (रू.४७७७४)** |
| ६ | २२ | ०२ | ९६८०० | ०५ | ०१ | -- | -- | ०४ | **मोना लेबर (रू.३२८०८)** |
| ७ | २० | ०२ | ९०५०० | ०३ | -- | -- | -- | ०३ | **मोना लेबर (रू.३५९७१)** |
| ८ | २४ | ०२ | १०३१०० | ०४ | -- | -- | -- | ०४ | **ईश्वरलाल खरे (रू.३४८७१)** |
| ९ | २९ | ०१ | १०६३५० | ०४ | -- | -- | -- | ०४ | **के.एम.सुरे (रू.४३८९५)** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | २० | ०१ | १०९५०० | ०५ | -- | ०१ | -- | ०४ | **निलेश लेबर (रू.३७३९२)** |
| | **२७६** | **१८** | **११५०९००** | **५८** | **०९** | **०५** | **०१** | **४३** | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र.३०९ :</u>**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मोहल्ला पदमपूरा येथील जय टॉवर व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव / निविदा पध्दतीने जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.२३-३-२००६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष ठिकाणी व्यापारी संकुलात लिलाव सुरू केला असता

**१)** दुकान क्र.१९ करीता चार व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.अशोक संभाजी वानखेडे यांनी रक्कम रू.३०१५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

सदरील दुकाने मनपाने भाडे प्रती माह रू.१७१६/- ठरविलेले आहे. प्रत्यक्ष जाहीर लिलावात बोली मध्ये दुकान क्र.१९ करीता श्री.अशोक संभाजी वानखेडे यांनी रू.३०१५/- प्रती माह भाडे अशी बोली बोलली आहे.

तरी सदरील प्रकरणी दुकान क्र.१९ करीता श्री.अशोक संभाजी वानखेडे रक्कम रू.३०१५/- प्रती माह भाडे, अनामत व तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून करारनामा करून सदरील दुकाने भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने सभागृहाने दुकाने देण्याचा निर्णय घेतलेला आहे. अंमलबजावणी होत आलेली आहे.

श्री. गजानन बारवाल : योग्य निर्णय आहे दुकाने भाड्याने देतो. जय टॉवर्स येथील दुकानांची दुरावस्था झालेली आहे. तेथील दुरूस्तीची कामे बरोबर झालेली नाही. सदर इमारतीत पाळीव जनावरे वावरताना दिसतात. कृपया याची दखल घेण्यात यावी व दुरूस्तीची कामे तातडीने करावी.

श्री.मुजीब खान : माझ्या प्रभागात रस्त्यावर अतिक्रमण आजही पुढे आलेले आहे. त्या लोकांकडून देखील योग्य वर्तणूक होत नाही. उपायुक्तांच्या अंगावर लोकं धाऊन आले होते. बांधकाम परवानगी तपासून त्यांचेवर कारवाई करावी.

सौ.लता दलाल : महानगरपालिकेच्या जागेवर नंतर जास्तीचे बांधकाम होऊन भाजीमंडी भागात नागरीकांना फिरणे अवघड होते. दिलेल्या दुकानांचा विनियोग करतांना अंतर्गत बदल करतात ते बंद करण्यात यावे.

मा. सभापती : उप आयुक्त (म) विभागाकडून अत्यंत चांगले काम महसूल वाढवण्याच्या दृष्टीकोनातून होत आहे. स.सदस्यांच्या सूचना लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

श्री.शशांक विसपुते : आपले काम अंकुश ठेवण्याचे आहे. भाड्यामध्ये फेरफार कसे करायचे त्याबद्दल निर्णय व्हावा.

मा. सभापती : भाडे समिती गठीत झालेली आहे. नियमावलीचा संपूर्ण अभ्यास करण्यात यावा. करारनाम्याचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी.

महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून वस्तुस्थितीची जाण ठेवावी.

श्री.कंवरसिंग बैनाडे : ११ महिन्यात स्थायी समितीमध्ये अनेक कामांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. बरीच कामे मार्गी लागली आहेत. आपल्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खालावलेली होती. त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. जकातीचे खाजगीकरण, खाजगीकरणातून शहर बससेवा सुरू केली. मा.सभापती, मा.आयुक्त, मा.उपआयुक्त यांनी चांगली मदत केली. काही सदस्यांसाठी ही शेवटची सभा होईल. मा. सभापती यांचे अभिनंदन करण्यात येते.

मा. सभापती : सर्वानुमते मंजूर, भावी सभापती येतील. आम्ही सर्व प्रशासनाकडून अपेक्षा ठेवतो की, आपले नाव कसे उंचावेल यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. सर्वांनी ११ महिने सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो.

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेच्या शाळेमध्ये प्रथमोचाराची सोय नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या पदमपुरा येथील जय टॉवर व्यापारी संकुलातील दुकाने भाडे तत्वावर देण्याकरीता झालेल्या जहीर लिलावातील बोलीनुसार दुकान क्र.१९ करीता श्री.अशोक संभाजी वानखेडे यांना रू.३०१५/- प्रतीमाह भाडे, अनामत तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी.प्रती माह आकारून नियमाप्रमाणे सदरील दुकान भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१० :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मोहल्ला औरंगपूरा येथील पिया मार्केटव्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव / निविदा पध्दतीने जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.२०-३-२००६ रोजी दुपारी १:०० वाजता प्रत्यक्ष ठिकाणी व्यापारी संकुलात लिलाव सुरू केला असता

**१)** दुकान क्र.७ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.विशाल लिबंजु जातेकर यांनी रक्कम रू.९००/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**२)** दुकान क्र.१० करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.प्रेमचंद जवरीलाल साकला यांनी रक्कम रू.५६०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**३)** दुकान क्र.११ करीता चार व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.राजेंद्र एकनाथ मोरे यांनी रक्कम रू.५६५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**४)** दुकान क्र.१४ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.अश्रफ हुसेन यांनी रक्कम रू.५७०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**५)** दुकान क्र.१५ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.जहागीर हुसेन मोहमद यांनी रक्कम रू.५७५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**६)** दुकान क्र.१७ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.फकरोद्यीन महमद इसाकद्यीन यांनी रक्कम रू.५७५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**७)** दुकान क्र.१८ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली अध्यक्ष, राष्ट्रीय दृष्टीहिन संघ, महाराष्ट्र यांनी रक्कम रू.५५०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**८)** दुकान क्र.१९ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली सौ.लताबाई रमेशराव कंचनकर यांनी रक्कम रू.५७०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**९)** दुकान क्र.२० करीता पाच व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.महमद मुस्तफा गुलाम जैनऊद्दीन यांनी रक्कम रू.६३५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१०)** दुकान क्र.२१ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.अनिस अहमद मुसा यांनी रक्कम रू.७०५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**११)** दुकान क्र.२२ करीता चार व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.चंद्रकांत चव्हाण यांनी रक्कम रू.६३५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१२)** दुकान क्र.२३ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.फातेमा बेगम मो.एकबाल अहेमद यांनी रक्कम रू.५७५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१३)** दुकान क्र.२४ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.मो.मझरोद्दीन मो.कलीमुद्यीन यांनी रक्कम रू.५७०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१४)** दुकान क्र.२६ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.संतोष केवलचंद जैन यांनी रक्कम रू.५८०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१५)** दुकान क्र.२७ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.मेहराज शेख शरीफ यांनी रक्कम रू.५७०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१६)** दुकान क्र.२८ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.महमद मसुद अहमद कैसर यांनी रक्कम रू.५६०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१७)** दुकान क्र.२९ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.महमद अब्दुल कय्युम महमंद अब्दुल जब्बार यांनी रक्कम रू.५७०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१८)** दुकान क्र.३० करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.शेख इद्रीस शेख महेमुद यांनी रक्कम रू.५७०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

वरील सर्व दुकानांसाठी मनपाने प्रती माह भाडे रू.५४०/- ठरविलेले होते. प्रत्यक्षात जाहीर लिलावात बोली मध्ये मनपाने ठरविलेल्या भाड्यापेक्षा बोलीधारकाने जास्तीची बोली बोलली आहे.

तरी वरील प्रकरणी अ.क्र.१ ते १८ मधील बोलीधारकाकडून जास्तीच्या बोली प्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून करारनामा करून सदरील दुकाने
भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या औरंगपुरा येथील पिया मार्केट व्यापारी संकुलातील दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी झालेल्या जहीर लिलावानुसार प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते १८ मधील दुकान क्र.७, १०, ११, १४, १५, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २६, २७, २८, २९ व ३० साठी जस्तीचे बोलीधारकाकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच र.रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी.प्रती माह आकारून सदरील दुकाने भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३११ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मोहल्ला चिकलठाणा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव / निविदा पध्दतीने जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.२२-३-२००६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष ठिकाणी व्यापारी संकुलात लिलाव सुरू केला असता

**१)** दुकान क्र.३ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली सौ.सुमन अकुंश संकपाळ यांनी रक्कम रू.१०५०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**२)** दुकान क्र.४ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.साईनाथ रामभाऊ रिठे यांनी रक्कम रू.८३५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**३)** दुकान क्र.५ करीता पाच व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.शांतीलाल सुरजमल मुगदीया यांनी रक्कम रू.१०१५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**४)** दुकान क्र.६ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.कौसल्याबाई अनंत क्षिरसागर यांनी रक्कम रू.१२८०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**५)** दुकान क्र.७ करीता पाच व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.निसार खान मजूर खान यांनी रक्कम रू.१४५०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

सदरील दुकानाकरीता मनपाने प्रती माह भाडे अनुक्रमे रू.७८४/- ठरविलेले आहे. प्रत्यक्ष जाहीर लिलावाच्या बोली मध्ये दुकान क्र.३, ४, ५, ६ व ७ साठी संबंधिताने अनुक्रमे प्रती माह भाडे रू.१०५०/-, रू.८३५/-, रू.१०१५/-, रू.१२८०/-, रू.१४५०/- जास्तीची बोली बोलली आहे.

तरी वरील प्रकरणी अ.क्र.१ ते ५ मधील बोलीधारकाकडून जास्तीच्या बोली प्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून करारनामा करून सदरील दुकाने
भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या चिकलठाणा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जहीर लिलावानुसार प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते ५ मधील दुकान क्र.३, ४, ५, ६ व ७ साठी जस्तीचे बोलीधारकाकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच र.रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी.प्रती माह आकारून सदरील दुकाने भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३१२ :</u>**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंग मंदीर, उस्मानपुरा येथील कॅन्टीन भाडेतत्वावर चालविण्यासाठी जाहीरात दिली असता दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या व त्यात सौ.वैशाली प्रशांत बोधनकर यांनी भरलेली निविदा रक्कम रू.९२५०/- होती व मनपाने संत एकनाथ रंग मंदीर येथील कॅन्टीन चालवण्यिासाठी रू.८२३५/- अशी आधारभुत किमंत ठेवली होती. सौ.वैशाली प्रशांत बोधनकर यांनी प्रती महिना रू.९२५०/- निविदा भरलेली होती. परंतु मागील गुत्तेदार श्री.गणेश शेट्टी यांनी चांगली सुविधा मागे दिल्याने बऱ्याच स.सदस्यांनी त्याच्या नावाची शिफारस केली असता मा.सभापती यांनी ठराव क्र.३८, दि.२४-८-२००५ मध्ये घेतला व सदरील ठराव स्थगीत ठेवला होता.

मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार श्री.गणेश शेट्टी यांना संत एकनाथ रंग मंदीर कॅन्टीनचे गुत्तेदारास दि.१-९-२००५ ते ३१-३-२००७ पर्यंत रू.९२५०/- प्रती महिना घेऊन कॅन्टीन चालविण्यासाठी मुदतवाढ देण्यासाठी शिफारस प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथील कॅन्टीन भाडेतत्वावर चालविण्यासाठी कॅन्टीन चालविणारे गुत्तेदार श्री.गणेश शेट्टी यांनी चांगली सुविधा दिल्यामुळे त्यांना

दि.१.९.२००५ ते ३१.३.२००७ पर्यंत रू.९२५०/- प्रती महिना घेऊन कॅन्टीन चालविण्यासाठी मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१३ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला रेल्वेस्टेशन झोन क्र.६ येथील मोकळया जागेत अतिक्रमण विभागाने जप्त केलेले भंगार साहित्याचा लिलाव करण्यासाठी मनपाने जा.क्र./मनपा/६७९/२००६, दिनांक २-३-२००६ रोजी प्रसिध्दीस दिली असता व दि.२७-३-२००६ रोजी सकाळी ११:०० वाजता लिलाव जाहीर बोली / निविदा पध्दतीने ठेवला असता त्यात एकूण चौदा व्यक्तींनी भाग घेतला. उप आयुक्त (महसूल) यांनी बोलीस सुरूवात केली असता श्री.मिर्झा कलीम बेग यांनी प्रती किलो भंगार रू.१२.३०/- अशी बोली बोलली आहे.

मनपाने भंगार मालाची आधारभुत किमंत रू.१२/- प्रती किलो अशी ठेवली होती. त्यापेक्षा जास्त बोली रू.१२.३०/- प्रती किलो श्री.मिर्झा कलीम बेग यांनी बोलली असल्याने करीता सदरील दराप्रमाणे संबंधित बोलीधारक श्री.मिर्झा कलीम बेग यांना सदरील भंगार देणेचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन जवळील(झोन क्र.६) च्या मोकळ्या जगेत अतिक्रमण विभागाने जप्त केलेले भंगार साहित्याच्या झालेल्या लिलावानुसार जस्तीची बोली बोलणारे श्री.मिर्झा कलीम बेग यांना प्रती किलो रू.१२.३० या दराने भंगार देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१४ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००६-२००७ या सालाकरीता सिध्दार्थ उद्यान वाहनतळाच्या जागेवर महानगरपालिकेतर्फे बी.ओ.टी.चे काम सुरू होत असल्याने सिध्दार्थ उद्यान वाहनतळाची निविदा / बोली सन २००६-०७ साठी करण्यात आलेली नाही.

सन २००५-०६ साठी आधारभुत रक्कम रू.२७६१६/- प्रती माह अशी होती. सन २००६-०७ साठी यात नैसर्गीक वाढ १०% करून आधारभुत रक्कम रू.३०३७८/- प्रती माह ठेवावी लागली असती. परंतु सन २००५-०६ साली एम.डी.नईम सौदागर यांनी रू.३९७००/- प्रती माह निविदेनुसार त्यांनी फी वसूली केलेली आहे. त्यांचा ठेका दि.३१-३-२००६ रोजी संपत असल्यामुळे त्यांना त्याच दराने पुढे बी.ओ.टी.चे काम सुरू होईपर्यंत त्याच दरात काम करण्यास पत्राद्वारे विचारणा केली असता त्यांनी रू.३२०००/- प्रती माहने काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी ही रक्कम सन २००६-०७ च्या आधारभुत रक्कम रू.३०३७८/- पेक्षा जास्त असल्याने सिध्दार्थ उद्यान वाहनतळाचे बी.ओ.टी.चे काम सुरू होई पर्यंत श्री.एम.डी.नईम सौदागर यांना रू.३२०००/- प्रती माह नुसार सन २००५-२००६ च्या दराने सन २००६-०७ साठी मुदतवाढ देऊन फी वसूली करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर .

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान वाहनतळाच्या बी.ओ.टी.चे काम सुरू होईपर्यंत श्री.एम.डी.नईम सौदागर यांना रू.३२०००/- प्रती माह प्रमाणे सन २००५-०६ च्या अटी-शर्तीनुसार सन २००६-२००७ साठी मुदतवाढ देऊन फि वसुल करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१५ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मो.भिमपूरा उस्मानपुरा येथील अभ्यासिका केंद्र क्षेत्र ३४.८५ चौ.मी.भाड्याने

देणे बाबत जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.१७-३-२००६ रोजी सकाळी ११:०० वाजता मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद येथे लिलाव सुरू केला असता

सदर अभ्यासिका केंद्रा करीता तीन जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.भरत सोपानराव पट्टेबहादुर यांनी रक्कम रू.३६००/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

वरील अभ्यासिका केंद्रासाठी मनपाने प्रती माह भाडे रू.२९९७/- व अनामत रू.४८७९०/- असे ठरविलेले आहे. प्रत्यक्षात जाहीर लिलावाच्या बोली मध्ये अभ्यासिका केंद्रासाठी मनपाने ठरवुन दिलेल्या मासिक भाड्यापेक्षा बोलीधारकाने जास्तीची बोली बोलली आहे.

तरी वरील प्रकरणी बोलीधारकाकडून जास्तीच्या बोली प्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून व करारनामा करून घेऊन सदरील अभ्यासिका केंद्र भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या भिमपुरा उस्मानपुरा येथील अभ्यासिका केंद्र भाड्याने देण्याकरीता झालेल्या लिलावानुसार जस्तीचे बोलीधारक श्री.भरत सोपानराव पट्टेबहादुर यांना प्रतीमाह रू.३६००/- भाडे, अनामत तसेच र.रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी.प्रती माह आकारून नियमानुसार सदरील अभ्यासिका केंद्र भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१६ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मो.गारखेडा, नभुक्र.१५३०२/१२ येथील सांस्कृतीक सभागृह क्षेत्र १११.२२ चौ.मी. भाड्याने देणे बाबत जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.१७-३-२००६ रोजी सकाळी ११:०० वाजता मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद येथे लिलाव सुरू केला असता

सदर सांस्कृतीक सभागृह करीता दोन जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री. हुसेन मासुन जमादार, सचिव, स्वामी विवेकांनद व्यायामशाळा क्रीडा मंडळ यांनी रक्कम रू.८७४२/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

वरील सांस्कृतीक सभागृहसाठी मनपाने प्रती माह भाडे रू.८३४२/- व अनामत रू.१,६०,१५७/- असे ठरविलेले आहे. प्रत्यक्षात जाहीर लिलावाच्या बोली मध्ये सदर सांस्कृतीक सभागृहा करीता मनपाने ठरवुन दिलेल्या मासिक भाड्यापेक्षा बोलीधारकाने जास्तीची बोली बोलली आहे.

तरी वरील प्रकरणी बोलीधारकाकडून जास्तीच्या बोली प्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून व करारनामा करून घेऊन सदरील सांस्कृतीक सभागृह भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या गारखेडा न.भु.क्र.१५३०२/१२ येथील सांस्कृतिक सभागृह भाड्याने देण्यासाठी झालेल्या लिलावानुसार जस्तीची बोली बोलणारे श्री.हुसेन मासुन जमादार, सचिव, स्वामी विवेकानंद व्यायामशाळा क्रिडा मंडळ यांना प्रतिमाह रू.८७४२/- भाडे, अनामत तसेच र.रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी.प्रती माह

आकारून नियमाप्रमाणे सदरील सांस्कृतिक सभागृह भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१७ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मोहल्ला कबाडीपूरा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव / निविदा पध्दतीने जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.२२-३-२००६ रोजी दुपारी १:०० वाजता प्रत्यक्ष ठिकाणी व्यापारी संकुलात लिलाव सुरू केला असता

**१)** दुकान क्र.५ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.सरदार खान उस्मान खान यांनी रक्कम रू.२१०५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**२)** दुकान क्र.१२ करीता तीन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.शेख शफीक शेख गुलाब यांनी रक्कम रू.१५०५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

सदरील दुकानाकरीता मनपाने प्रती माह भाडे दुकान क्र.५ साठी रू.१७३३/- व दुकान क्र.१२ साठी रू.१४९०/- ठरविलेले आहे. प्रत्यक्ष जाहीर लिलावात बोली मध्ये दुकान क्र.५ करीता श्री.सरदार खान उस्मान खान यांनी रू.२१०५/- व दुकान क्र.१२ करीता श्री.शेख शफीक शेख गुलाब यांनी रू.१५०५/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोललेली आहे.

तरी सदरील प्रकरणी दुकान क्र.५ करीता श्री.सरदार खान उस्मान खान व दुकान क्र.१२ करीता श्री.शेख शफीक शेख गुलाब यांनी अनुक्रमे भाडे रू.२१०५/- व रू.१५०५/-, तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून करारनामा करून सदरील दुकाने भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जहीर लिलावानुसार दुकान क्र.५ करीता श्री.सरदार खान उस्मानखान व दुकान क्र.१२ करीता श्री.शेख शफीक शेख गुलाब यांना अनुक्रमे रू.२१०५/- व रू.१५०५/- प्रतिमाह भाडे, तसेच रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी.प्रती माह आकारून नियमाप्रमाणे सदरील दुकाने भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१८ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मोहल्ला एकनाथनगर येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव / निविदा पध्दतीने जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.२८-३-२००६ रोजी सकाळी ११:०० वाजता मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद येथे लिलाव सुरू केला असता

**१)** दुकान क्र.५ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.ललीता उत्तम अंभोरे यांनी रक्कम रू.१०३०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**२)** दुकान क्र.६ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली सौ.कोमल संतोष काळे यांनी रक्कम रू.११११/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**३)** दुकान क्र.९ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.पांडुरंग साहेबराव पगारे यांनी रक्कम रू.१०००/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**४)** दुकान क्र.११ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.रमेश दाजीबा आदमाने यांनी रक्कम रू.८६०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**५)** दुकान क्र.१२ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.मधुकर लिबांजी चव्हाण यांनी रक्कम रू.६२०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**६)** दुकान क्र.१३ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.बबन विश्‍वनाथ सोनवणे यांनी रक्कम रू.४७०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**७)** दुकान क्र.१८ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.हौसाबाई तुळशिराम बोर्डे यांनी रक्कम रू.५५५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**८)** दुकान क्र.१९ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.अजमत आजमर खान यांनी रक्कम रू.४५०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**९)** दुकान क्र.२० करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.योगेश मगन मोरे यांनी रक्कम रू.५६०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१०)** दुकान क्र.२२ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.जोधंळे सुनिलकुमार मोतीराम यांनी रक्कम रू.६१५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**११)** दुकान क्र.२३ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.राजु शामराव कोलते यांनी रक्कम रू.६००/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१२)** दुकान क्र.२६ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.धनराज शामराव शिंदे यांनी रक्कम रू.८३०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१३)** दुकान क्र.२९ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.जीजाबाई अशोक शिंदे यांनी रक्कम रू.८९९/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१४)** दुकान क्र.३० करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.सुनिल लक्ष्मण बनकर यांनी रक्कम रू.१७८२/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१५)** दुकान क्र.२४ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.आनंदाबाई आनंद खोबरे यांनी रक्कम रू.८००/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१६)** दुकान क्र.४ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.राजु देवराव मोरे यांनी रक्कम रू.१०२५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१७)** दुकान क्र.२४ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली सौ.सुलभा मगन मोरे यांनी रक्कम रू.७५०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१८)** दुकान क्र.१७ करीता अनेक जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली सौ.सविता वासुदेव पळसपगारे यांनी रक्कम रू.७४०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**१९)** दुकान क्र.२७ करीता दोन व्यक्तींनी जणांनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.कन्हैय्यालाल बादशाह यांनी रक्कम रू.७४०/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

वरील सर्व दुकानासाठी मनपाने प्रती माह भाडे रू.३००/- व अनामत रू.७५००/- असे ठरविलेले आहे. प्रत्यक्षात जाहीर लिलावाच्या बोली मध्ये वरील दुकानांसाठी मनपाने ठरवुन दिलेल्या मासिक भाड्यापेक्षा बोलीधारकाने जास्तीची बोली बोलली आहे.

तरी वरील प्रकरणी अ.क्र.१ ते १९मधील बोलीधारकाकडून जास्तीच्या बोली प्रमाणे एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून करारनामा करून सदरील दुकाने भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या एकनाथनगर येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जहीर लिलावानुसार प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते १९ मधील दुकान क्र. ४, ५, ६, ९, ११, १२, १३, १७, १८, १९,२०, २२, २३, २४, २६, २७,२९, ३० साठी जस्तीचे बोलीधारकाकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे व अनामत तसेच र.रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी.प्रती माह आकारून सदरील दुकाने भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१९ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मोहल्ला गारखेडा येथील मालखरे व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव / निविदा पध्दतीने जा.क्र./मनपा/६३०/२००६, दिनांक १०-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिली असता व दि.२४-३-२००६ रोजी दुपारी ४:०० वाजता प्रत्यक्ष ठिकाणी व्यापारी संकुलात लिलाव सुरू केला असता

**१)** दुकान क्र.१ करीता सहा व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्री.आनंद दिवाकर चक्रनारायण यांनी रक्कम रू.३००५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

**२)** दुकान क्र.३ करीता दोन व्यक्तींनी बोली भाग घेतला व जास्तीची बोली श्रीमती.वैशाली गजानन मोताळे यांनी रक्कम रू.२२०५/- प्रती माह भाड्याची बोली बोललेली आहे.

सदरील दुकानाकरीता मनपाने प्रती माह भाडे दुकान क्र.१ साठी रू.२७३२/- व दुकान क्र.३ साठी रू.२१७४/- ठरविलेले आहे. श्री.आनंद दिवाकर चक्रनारायण यांनी रू.३००५/- व श्रीमती.वैशाली गजानन मोताळे यांनी रू.२२०५/- प्रती माह भाडे अशी जास्तीची बोली बोललेली आहे.

तरी सदरील प्रकरणी दुकान क्र.१ करीता श्री.आनंद दिवाकर चक्रनारायण व दुकान क्र.३ करीता श्रीमती.वैशाली गजानन मोताळे यांनी अनुक्रमे भाडे रू.३००५/- व रू.२२०५/- तसेच रक्कम रू.५/- सेवा शुल्क प्रती चौ.मी. प्रती माह आकारून नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षीक भाडे वसूल करून करारनामा करून सदरील दुकाने भाड्याने देणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या गारखेडा येथील मालखरे व्यापारी संकुलातील दुकाने भाडे तत्वावर देण्यासाठी झालेल्या जहीर लिलावानुसार दुकान क्र.१ करीता श्री.आनंद दिवाकर चक्रनारायण व दुकान क्र.३ साठी श्रीमती वैशाली गजनन मोताळे यांना अनुक्रमे रू.३००५/- व रू.२२०५/- प्रतीमाह भाडे तसेच रू.५/- सेवाशुल्क प्रती चौ.मी.प्रती माह आकरून नियमाप्रमाणे सदरील दुकाने भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२० :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी आठवडी बाजार सन २००६-२००७ साठी निविदा मागविण्यासाठी मागील वर्षी सन २००५-२००६ सालची आधारभुत रक्कम रू.९५००/- मध्ये १०% वाढ करून रक्कम रू.१०४५०/- प्रती बाजार येत होती. परंतु मागील वेळेस कमी भावाने बाजार गेल्याने अजुन रू.५०००/- वाढ करून सन २००६-०७ साठी रू.१५४५०/- आधारभुत किमंत ठरविली होती. परंतु संचिका मान्यतेस्तव पाठविण्यात आली असता मा.उप आयुक्त (महसूल), मा.शहर अभियंता व बी.ओ.टी. प्रकल्प राबविणारे अभियंता यांच्याशी

झालेल्या चर्चेनुसार सदरील जागेत बी.ओ.टी. प्रकल्प मनपातर्फे विकसीत करावयाचे असल्याने निविदा / बोली केलेली नाही. शहानुरवाडी बाजार जागेवरील बी.ओ.टी.चे काम सुरू होई पर्यंत कोणास फी वसूली करून द्यावी, यांचे मार्गदर्शन मागीतले असता जुन्याच ठेकेदारास नविन दराप्रमाणे मुदतवाढ देणे बाबत मा.आयुक्त यांनी मान्यता दिली होती. त्या बाबत संबंधित ठेकेदारास विचारणा केली असता संबंधित गुत्तेदाराने ✖मला नविन दराने रू.१५४५०/- प्रती बाजार परवडत नसल्याने✖ त्यांनी लेखी देऊन रक्कम रू.१०५००/- फी वसूलीचा ठेका मागीतला आहे. संबंधित ठेकेदाराचा प्रस्ताव रक्कम रू.१०५००/- प्रस्तावित करून प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविला असता तुर्त रक्कम रू.११०००/- प्रती बाजार देऊन नंतर निविदा / बोली काढणे योग्य राहील. मा.आयुक्त यांनी या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

तेव्हा जुन्याच ठेकेदारास तुर्त रक्कम रू.११०००/- प्रती बाजार प्रमाणे दि.१-४-२००६ पासुन सदर बाजारासाठी निविदा काढुन नव्या ठेकेदारास आदेश देई पर्यंत श्री.स्वप्नील प्रभाकर मांजरे यांना मुदतवाढ जुन्याच अटी शर्तीसह देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी आठवडी बाजर जगेवरील बी.ओ.टी.चे काम सुरू होईपर्यन्त व निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत दि.१.४.२००६ पासून प्रती बाजर रू.११०००/- बाजर फी वसुलीचे काम करणारे ठेकेदार श्री.स्वप्नील प्रभाकर मांजरे यांना जुन्या अटी-शर्तीसह मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२१ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की ,दिनांक १५.१२.२००५ रोजे विषय क्र.१४० अन्वये संगणक व संगणक साहित्य खरेदी करण्याबाबत एजन्सी बरोबर पुन्हा वाटाघाटी कराव्यात किंवा पुन्हा नव्याने निविदा मागवून कार्यवाही करावी सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत यावा असे सभागृहात ठरले होते. त्याप्रमाणे दिनांक २९.३.२००६ रोजे मा. आयुक्त यांच्या दालनांत आर.सी.धारक संगणक पुरवठा करणाऱ्या एजन्सीना बोलावण्यात आले व त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. या बैठकीस ॲकॉर्ड कॉम्प्युटर्स, वर्गो सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस, नॅशनल टेलि लिंक, स्पाईस लि., डिजेटल कॉम्प्युटर्स, डि.एस.के.इन्फ़ोटेक प्रा.लि. या एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांना शासनाच्या आर.सी.तील आयटम नंबर ३,१०३,१२१ च्या स्पेसीफ़िकेशनप्रमाणे तसेच मनपाने मागविलेल्या निवेदेतील स्पेसीफ़िकेशनप्रमाणे संगणक व संगणक साहित्य पुरवठा करण्यासाठी अंतिम ऑफ़र (दर) देण्याबाबत सुचना केली त्यानुसार मे. स्पाईस लि.पुणे , भक्तीज कॉम्प्युटर्स,औरंगाबाद ,डी.एस.के. इन्फ़ोटेक प्रा.लि. या तीन एजन्सीकडून अंतिम दरपत्रक प्राप्त झाले. त्याचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.

**संगणक व संगणक साहित्य खरेदी (दिनांक २९.३.०६ मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार )**

**एजन्सी निहाय दराचे विवरण पत्र**

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | साहित्याचे नांव | संमती दिलेले दर रू. | खरेदी नग | एकूण रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डि.एस.के.इन्फ़ोटेक प्रा.लि. | संगणक, आर. सी .शेड्यूल १,आयटम नं.३ | ३४५६० | ३० | १०३६८०० |
| | | प्रिन्टर, शेड्यूल १८,आयटम नं.१२१ | ८४४५ | ३० | २५३३५० |
| | | युपी.एस (निविदेतील स्पेसिफ़िकेशन प्रमाणे) | १८७२ | ३० | ५६१६० |
| | | एम.एस.ऑफ़ीस सॉफ़्टवेअर , | १५३३६ | ३० | ४६००८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आर. सी .शेड्यूल १७,आयटम नं.१०३ | | | |
| | | ॲन्टी व्हायरस क्वीक हिल (निविदेतील स्पेसिफ़िकेशन प्रमाणे) | ११०० | ३० | ३३००० |
| | | एकूण रक्कम | | | १८३९३९० |
| | | अंदाजेअतिरिक्त साहित्यांची किंमत | | | १२००० |
| | | **अतिरिक्त साहित्याची किंमत धरून येणारी रक्कम.** | | | **१८२७३९०** |
| २ | स्पाईस लि. | संगणक, आर. सी .शेड्यूल १,आयटम नं.३ | ३४३४१ | ३० | १०३०२३० |
| | | प्रिन्टर, शेड्यूल १८,आयटम नं.१२१ | ८३५१ | ३० | २५०५३० |
| | | युपी.एस (निविदेतील स्पेसिफ़िकेशन प्रमाणे) | १९५० | ३० | ५८५०० |
| | | एम.एस.ऑफ़ीस सॉफ़्टवेअर , आर. सी .शेड्यूल १७,आयटम नं.१०३ | १३८०० | ३० | ४१४००० |
| | | ॲन्टी व्हायरस क्वीक हिल (निविदेतील स्पेसिफ़िकेशन प्रमाणे) | ११०० | ३० | ३३००० |
| | | एकूण रक्कम रू. | | | १७८६२६० |
| | | अंदाजेअतिरिक्त साहित्यांची किंमत | | | ४२००० |
| | | **अतिरिक्त साहित्याची किंमत धरून येणारी रक्कम.** | | | **१७४४२६०** |
| ३ | भक्तीज कॉम्प्युटर्स | संगणक, आर. सी .शेड्यूल १,आयटम नं.३ | ३४५६० | ३० | १०३६८०० |
| | | प्रिन्टर, शेड्यूल १८,आयटम नं.१२१ | ८४४५ | ३० | २५३३५० |
| | | युपी.एस (निविदेतील स्पेसिफ़िकेशन प्रमाणे) | १९५० | ३० | ५८५०० |
| | | एम.एस.ऑफ़ीस सॉफ़्टवेअर , आर. सी .शेड्यूल १७,आयटम नं.१०३ | १३८०० | ३० | ४१४००० |
| | | ॲन्टी व्हायरस क्वीक हिल (निविदेतील स्पेसिफ़िकेशन प्रमाणे) | ११०० | ३० | ३३००० |
| | | एकूण रक्कम रू. | | | १७९५६५० |
| | | अंदाजेअतिरिक्त साहित्यांची किंमत | | | ५४००० |
| | | **अतिरिक्त साहित्याची किंमत धरून येणारी रक्कम.** | | | **१७४१६५०** |

१) डि.एस.के. या एजन्सी ने आवश्यक ते संगणक व संगणक साहित्य मा. आयुक्त, यांचेशी चर्चा झालेल्या कॉन्फ़ीग्रेशन व स्पेसिफ़ीकेशन प्रमाणे रू. १८३९३९० /- या दरात देण्यांत मान्य केले असून याव्यतिरिक्त रू. १२०००/- चे अतिरिक्त साहित्य देण्यांचे मान्य केले आहे. २) स्पाईस लि. या एजन्सीने वरील साहित्य रू.१७८६२६०/-या दरात देण्यांत मान्य केले असून या व्यतिरिक्त रू.४२०००/- चे अतिरिक्त साहित्य देण्यांचे मान्य केले आहे. ३)भक्तीजकॉम्प्युटर या एजन्सीने वरील साहित्य रू.१७९५६५०/-या दरात देण्यांत मान्य केले असून या व्यतिरिक्त रू.५४०००/- चे अतिरिक्त साहित्य देण्याचे मान्य केले आहे. वरील तीनही एजन्सीचा विचार केला असता भक्तीज कॉम्पयुटर्स या एजन्सीने अतिरिक्त देण्यांत येणारे साहित्य इतर एजन्सीपेक्षा जस्त देण्याचे मान्य केल्या मुळे व संबंधित एजन्सीचे दर मनपाला फ़ायद्याचे असल्यामुळे या दरास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

<u>**ठराव :**</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संगणक व संगणक साहित्य खरेदी करण्याकरीता आर.सी.धारक संगणक पुरवठा करणाऱ्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती भक्तीज कॉम्प्युटर या एजन्सीने प्रस्तावात नमूद केलेले संगणक व संगणक साहित्य १७,९५,६५०/- या दरात व अतिरिक्त

देण्यात येणारे साहित्य इतर एजन्सीपेक्षा जस्त (म्हणजेच रू.५४,०००/-चे) देण्याचे मान्य केल्यामुळे मे.भक्तीज कॉम्प्युटर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२२ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेची कार्यकक्षा दिवसेंदिवस वाढत आहे. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सेवा सुविधा याच बरोबर देण्यात येणारे बांधकाम परवाने, शहरातील रस्ते साफसफाई, दिवाबत्ती, जलनि:सारण व्यवस्था, आरोग्य सेवा, वाहतुक सेवा आदींची माहिती तसेच देण्यात येणारे परवाने, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विविध स्वरूपाचे ना हरकत प्रमाणपत्र, पर्यटन सुविधा आदींबाबत महापालिकेकडे नागरिक सातत्याने संपर्क साधत असतात. अशा स्वरूपाची माहिती नागरिकांना निश्चित स्वरूपात एखाद्या सेंटर वरून प्राप्त झाल्यास नागरिक तसेच शहरात येणारे पर्यटक यांच्यासाठी ते सोयीचे होऊ शकेल, तसेच मनपा प्रशासनावरील ताण कमी होईल. यासाठी मनपाचे कामकाज, मनपा मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा, पर्यटन विषयक माहिती आदीचे काम एखाद्या कॉल सेंटरला देणे मनपाच्या दृष्टीने देणे सोयीचे होईल. मे.सारंग इंटरप्राईजेस, उल्कानगरी, औरंगाबाद यांनी त्यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या कॉल सेंटरद्वारा नागरिक व पर्यटकांना महापालिकेशी संबंधीत विविध स्वरूपाची माहिती देण्याबाबत तयारी दर्शविली आहे. मे.सारंग इंटरप्राईजेस यांच्यामार्फत महापालिकेशी संबंधीत खालील प्रकारची माहिती देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे.

१. महापालिकेचे विविध विभाग, महापालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा.
२. महापालिकेच्या प्रभाग कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा.
३. आरंगाबाद शहरातील महत्वाची पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तु, विविध प्रकारची संग्रहालये तसेच महापालिकेतर्फे चालविली जणारी उद्याने, संग्रहालये, प्राणी संग्रहालय, उद्याने, छत्रपती शिवाजी महाराजपुराणवस्तु संग्रहालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, भारतमाता मंदिर, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, स्मृतीवन इत्यादी.
४. महापालिकेच्या एक खिडकी योजनेद्वारा देण्यात येणारे परवाने, परवानग्या व त्यासाठी लागणारी कागदपत्रांची माहिती.
५. मुलभूत सेवा सुविधांबाबत काही तक्रारी असल्यास त्या तक्रारींशी संबंधीत विभागांची माहिती देणे, तक्रारी नोंदवून घेणे व त्या संबंधीत विभागाकडे पाठविणे.
६. महापालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या शहर बसचे मार्ग व त्यांचे वेळापत्रक नागरिकांना उपलब्ध करून देणे.

उपरोक्त बाबी पाहता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मे.सारंग इंटरप्राईजेस यांना उक्त स्वरूपाचे काम देणे योग्य राहील.

१. उक्त स्वरूपाची माहिती देण्यासाठी संस्था औरंगाबाद शहरात स्वत:चे कार्यालय त्यांना योग्य वाटेल अशा ठिकाणी त्यांच्या इमारतीत सुरू करेल. सदरील कॉल सेंटरसाठी आवश्यक असणारे कार्यालय, कर्मचारी, फर्निचर, संगणक, टेलिफोन, इंटरनेट फॅसिलीटी व इतर आवश्यक सेवा आदी सुविधा संस्था स्वखर्चाने करून घेईल. यासाठी महापालिका कोणताही खर्च करणार नाही.

२. महापालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा आदीबाबतची सविस्तर माहिती सदरील कॉल सेंटरला महापालिका विनामुल्य पुरवेल.

३. कॉल सेंटरमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबतची जहिरात महानगरपालिकेतर्फे करण्यात येईल.

४. सुरूवातीस मे.सारंग इंटरप्राईजेस यांना सदरचे काम एक वर्षासाठी देण्यात येईल.

५. मे.सारंग इंटरप्राईजेस यांना, त्यांच्या कॉल सेंटर मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधापोटी महानगरपालिका दरवर्षी रू.५,९५,०००/- चार समान हप्त्यात देईल. यावरती द्यावे लागणारे शासकीय कर महापालिका अदा करेल.

६. सदरील कॉल सेंटरमार्फत नागरिकांना व पर्यटकांना महानगरपालिकेच्या कामाकाजशी व शहरातील पर्यटनाशी संबंधी माहिती देण्यात येईल. संस्थेच्या कामाकाजची व अनुषंगीक बाबींची जबाबदारी पुर्णत: संस्थेवर राहील.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सेवा सुविधा याच बरोबर देण्यात येणारे बांधकाम परवाने, शहरातील रस्ते साफसफाई, दिवाबत्ती, जलनि:सारण व्यवस्था, आरोग्य सेवा, वाहतुक सेवा आदींची माहिती तसेच देण्यात येणारे परवाने, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विविध स्वरूपाचे ना हरकत प्रमाणपत्र, पर्यटन सुविधा आदींबाबतची माहिती नागरिकांना निश्चित स्वरूपात कॉल सेंटरवरून उपलब्ध व्हावी याकरीता प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मे.सारंग इंटरप्राईजेस यांना सदरील काम तुर्त एका वर्षासाठी देण्यास व त्यासाठी लागणाऱ्या वार्षिक रू.५,९५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३२३ :</u>**

अग्निशमन दलासाठी घळीश्रींज्ञशी घऊॠ४०० झींाि ४ छीं. खरेदीस प्रशासकीय मान्यता दि.१३.१२.२००५ रोजे मिळाली व स्थायी समिती ठराव क्र.१७२ दि.१०.१.२००६ अन्वये आर्थिक मान्यता मिळाली आहे. राज्यस्तरीय व स्थानिक वर्तमानपत्रातून दिलेल्या जहीर निवेदनानुसार तीन निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा वाटाघाटीअंती च/ीढखत्रॠखठए रवि एसिळशिशी ी डर्शीोंळलश झींशि यांची असून त्यांचे दर रू.२६,८९,१२०/- असे आहेत. मनपासाठी हे दर एक वर्षासाठी लागू राहतील. अग्निमशन दलाच्या साहित्य खरेदी शिर्षकामध्ये रू.५० लक्ष आर्थिक तरतूदीतून रू.२६,८९,१२०/- च्या अंतीम दराच्या पम्प खरेदीस प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी घळीश्रींज्ञशी घऊॠ४०० झींाि ४ छीं. खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच रू.२६,८९,१२०/- या दराची च/ीढखत्रॠखठए रवि एसिळशिशी ी डर्शीोंळलश झींशि यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२४ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुन:र्बांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रूपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे, स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.४१६/४ दि.५.८.२००४ अन्वये मान्यता प्रदान झालेली आहे. अंदाजपत्रक र.रू.७१४.०० लक्ष किंमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-अ) रूपये २६३.८५ लक्ष किंमतीच्या स्थापत्य कामांचा तसेच (भाग-ब) रूपये ४५०.०० लक्ष किंमतीच्या यांत्रिकी कामांचा समावेश आहे.

निविदा सुचना क्र.१०७/०६ दि.२८.२.२००६ मधील अ.क्र.१ चे काम हे योजनेच्या फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे नवीन गेअर बॉक्सेस, मोटर्स इत्यादीचा पुरवठा करणे, उभारणी करणे व चाचणी देणे या कामाची निविदा रक्कम रूपये १२,७३,८०४/- किंमतीची आहे. निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत या कामाकरीता एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास चार दर भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा सक्षम अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दि.१८.३.२००६ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा १.५% कमी दराने. |
| २. मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ०.५% कमी दराने. |
| ३. रेणूका इलेक्ट्रीक कंपनी, औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दराने. |
| ४. मे.तिरूपती इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | अं.प.दरापेक्षा ३% जस्त दराने. |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांचे दर हे सर्वात कमी असून अं.प.दरापेक्षा १.५% कमी दराने आहेत.

करीता उक्त कामासाठी मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची अं.प.दरापेक्षा १.५% कमी दराची निविदा स्विकृत करणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे.

करीता उक्त कामाची मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची अं.प.दरापेक्षा १.५% कमी दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुन:र्बांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे नवीन गेअर बॉक्सेस, मोटर्स इत्यादीचा पुरवठा करणे, उभारणी करणे व चाचणी देणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १.५% कमी दराची मे.असन्सो लाईटस्, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२५ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव, अविष्कार कॉलनी, शुभश्री कॉलनी व गणेशनगर सिडको एन-८ भागात आठ विंधन विहिरी खोदून हातपंप बसविण्याच्या कामासाठी स.नगरसेवक यांची मागणी आहे.

या कामासाठी मा.सभापती, स्थायी समिती यांनी सतत पाठपुरावा केला आहे. पाणी विषय असल्याने सदरील काम तातडीने करणे आवश्यक आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)२ नुसार स्थायी समितीसमोर ठेवणे योग्य. याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५% कमी दराने श्री.मोटेगांवकर एस.एस.यांचे मार्फत काम करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव, अविष्कार कॉलनी, शुभश्री कॉलनी व गणेशनगर सिडको एन-८ भागात आठ विंधन विहिरी खोदून हातपंप बसविण्याचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५% कमी दराने श्री.मोटेगांवकर एस.एस.यांचे मार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२६ :**

दिनांक १९.१२.२००५ रोजेच्या सर्वसाधारण सभेमध्ये एनर्जी सेव्हींग दिवे लावण्यास मान्यता मिळाल्यानुसार सदरील काम बी.ओ.टी.पध्दतीने मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांचेमार्फत प्रायोगिक तत्वावर शहरातील ५००० पथदिव्यांची देखभाल दुरूस्ती करण्यासाठी दि.**२२.३.२००६** रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.**२८५** अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या ठरावाचे अनुषंगाने मी वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा प्रभागातील पथदिव्यांची देखभाल दुरूस्ती करण्याचे काम देखील मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक या एजन्सीमार्फत करण्यात यावे अशी मागणी केली होती व त्यास मा.सभापती यांनी तत्वत: मान्यता देखील दिलेली आहे. करीता वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा प्रभागात एनर्जी सेव्हींग पथदिवे लावण्याचे काम मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक या एजन्सीमार्फत मान्य दरानुसार करून घेण्यास मान्यता देण्यात यावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक : साहेबराव कावडे** **अनुमोदक : संतोष जेजूरकर, विनायक पांडे**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा प्रभागात एनर्जी सेव्हींग पथदिवे लावण्याचे काम देखील मे.विनवॉक सिस्टीम्स, नाशिक या एजन्सीमार्फत मान्य दरानुसार करून घेण्यास मान्यता देण्यात येते. दि.२२.३.२००६ च्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र.२८५ मध्ये सदरील बाब समाविष्ट करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२७ :**

लक्की स्टार क्रिडा मंडळ, खडकेश्वर औरंगाबाद ही रजिस्टर्ड संस्था असून या संस्थेतर्फे विविध प्रकारचे खेळ, स्पर्धा यांचे आयोजन करण्यात येते. या संस्थेने खडकेश्वर येथील सि.टी.एस. नं.२६१८ व २६२२ यामधील मनपाची मोकळी जगा संस्थेस भाडेतत्वावर देण्याची विनंती केलेली आहे. तरी लक्की स्टार क्रिडा मंडळ, औरंगाबाद या संस्थेस (नोंदणी क्र.महा/३९३/२००१ दि.३१.४.२००१) मनपाची मोकळी जगा१५ वर्षासाठी भाडे तत्वावर देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**सुचक : कंवरसिंग बैनाडे** **अनुमोदक : मुजीब आलमशाह खान**

मा. सभापती : लक्की स्टार क्रिडा मंडळ, खडकेश्वर या संस्थेने सिटीएस नं.२६१८ व २६२२ च्या मधील मनपाची मोकळी जगा भाडे तत्वावर देण्याची मागणी केलेली असून नियमानुसार भाडे समितीच्या शिफारशीनुसार भाडे निश्चित करण्यात यावे. तसेच प्रचलित अटी-शर्तीनुसार सदर संस्थेस ही जगा भाडे तत्वावर देण्यासंबंधीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्की स्टार क्रिडा मंडळ, खडकेश्वर औरंगाबाद या संस्थेस खडकेश्वर येथील सि.टी.एस. नं.२६१८ व २६२२ यामधील मनपाची मोकळी जगा नियमानुसार भाडे समितीच्या शिफारशीनुसार भाडे निश्चित करून प्रचलित अटी-शर्तीनुसार १५ वर्षासाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२८ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत,इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.२८ अंतर्गत असलेल्या औरंगाबाद टाईम्स कॉलनी नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक र.रू.१४,८१,६००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा सूचना क्र.१०६/२००६ अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत २१ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या दिवशी ०६ दर भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | अं.प.दरापेक्षा |
|---|---|---|
| १ | एल. के. कन्स्ट्रक्शन | ४.९९% जस्त दराने |
| २ | श्री.एम.ए. सईद | ६.००% जस्त दराने |
| ३ | ए.एस.कन्स्ट्रक्शन | ९.००% जस्त दराने |
| ४ | शेख मोहम्मद अझहर | ७.०० जस्त दराने |
| ५ | श्री.एस.एम.मंडोरे | ८.००% जस्त दराने |

उक्त प्रमाणे प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जस्त दराची निविदा एल.के.कन्स्ट्रक्शन यांची आहे. वाटाघाटीअंती मा.आयुक्तांनी सदरील काम अं.प.दरापेक्षा ०.२५% कमी दराने करण्यास मान्यता दिली असून मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी शिफारस केलेली आहे.

तरी एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२८ अंतर्गत असलेल्या औरंगाबाद टाईम्स कॉलनी नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम एल.के.कन्स्ट्रक्शन

यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२९ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत,इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नक्षत्रवाडी शाळेसाठी नविन इमारत बांधण्याच्या कामाचे र.रू.१९,९९,९११/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास मा.स्थायी समिती सभेने दि.७.८.२००४ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरील कामाची निविदा सूचना ज.क्र.मनपा/लेखा/नि./२००४/४३ दि.९.८.२००४ अन्वये प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदामधून सर्वात कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा ४.९९% जस्त दराचे मे.अमन असोसिएटस् यांची निविदा दराबाबत वाटाघाटीअंती सदर निविदा अंदाजपत्रकीय दराने मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.१२७ दि.२२.११.२००४ अन्वये मंजुरी दिल्यानुसार मक्तेदाराकडून सदर शालेय इमारतीचे काम सुरू करण्यात येऊन काम अंतीम स्थितीत असताना प्रत्यक्ष जयमोक्यावर प्रभागाच्या स.नगरसेविका यांनी कामामध्ये बदल व वाढ सुचविल्यानुसार शालेय इमारतीच्या कामामध्ये बदल व वाढ करण्यासाठी सुधारीत अर्थसंकल्प सन २००५-०६ मध्ये र.रू.३.०० लक्षची तरतुद प्रस्तावित केलेली आहे.

सदर सुधारीत तरतुदीनुसार शालेय इमारतीचे रक्कम रू.२२,९७,९११/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर सुधारीत अंदाजपत्रकामध्ये उर्वरीत वाढीव व अतिरिक्त बाबीसाठी र.रू.२,९८,०००/- ची वाढ होत असून त्यासाठी सुधारीत अर्थसंकल्प सन २००५-०६ मध्ये तरतुद करण्यात आली आहे. त्यास मा.आयुक्तांनी दि.२४.२.२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता नक्षत्रवाडी मनपा शाळेसाठी नविन इमारत बांधण्याच्या र.रू.२२,९७,९११/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सदर काम मुळ कामाचे गुत्तेदार मे.अमन असोसिएटस् यांच्याकडून मंजूर निविदा दराप्रमाणे म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी शाळेसाठी नवीन इमारत बांधणेच्या कामाचे वाढीव व अतिरिक्त बाबीसाठीचे र.रू.२,९८,०००/- ची वाढ झाल्यामुळे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.२२,९७,९११/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम मुळ कामाचे गुत्तेदार मे.अमन असोसिएटस् यांचेकडून मंजूर निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३० :**

**न.भू.क्र. १२४८३/१ बायजेपूरा येथील मंजूर रेंखांकनातील (जर्शि डरिलिश) वरील जिमनॅशियम हॉल करीता देण्यात आलल्या बांधकाम परवानगी बाबत अहवाल:-**

न.भू.क्र. १२४८३/१ बायजेपूरा या मिळकतीवर मनपा/**TPS/LYT**/४०३/८६ दिनांक १८/२/८६ नूसार रेखांकनास अंतिम मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर रेखांकनातील (**Open Space**) क्षेत्र ५२७.९२ चौ.मी. मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३१५/२४ दिनांक २५/१०/९६ नूसार १० % जगेवर जिमनांशियम हॉल बांधणे करीता जयटय ग्रुप ऑफ़ चिकलठाणा यांना ३०

वर्षे करीता अटी व शर्ती नूसार भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे . त्यानुसार जयटस ग्रुप सोबत नोटरीकृत करारणामा १०० /- रू. च्या बॉड पेपरवर दिनांक १२/०६/१९९७ रोजे करण्यात आलेला आहे.

जयट्स ग्रुप ऑफ़ चिखलठाणा यांनी भाडेतत्वावर दिलेल्या (**Open Space**) पैकी १०% जगेवर जिमनॉशिम हॉल करीता संचिका क्रमांक २९५/१७/०५-०६ दिनांक ०९/०९/२००५ नूसार बांधकाम परवानगी अनुज्ञेय करण्यात आली .

सदर बांधकाम परवानगी बाबत श्री. शेखर देसरडा यांनी खालील मुद्दे ,

०१. असे की सदरील ओपन स्पेस देतांना जहीर प्रगटन देऊन सर्व नागरीकांची संमती घेणे आवश्यक होते ते मनपा द्वारे केलेले नाही आणि म्हणून भाडे करार अनाधिकृत आहे.

०२. सदरील भाडे करार नोंदणीकृत दस्तावेज नसल्यामुळे बेकायदेशीर आहे व त्याचे अनुषंगाने दिलेली बांधकमा परवानगी सुध्दा बेकायदेशीर आहे.

०३. भाडेकराराचे अट क्रमांक १२ प्रमाणे भाडे करार नोंदणीकृत करणे आवश्यक होते व त्याची पूर्तता झालेली नाही म्हणुन भाडे करार रद्दकरणे आवश्यक आहे.

०४. तसेच मनपा मालमत्ता अधिकारी तर्फ़े दिनांक ३०/११/०४ रोजे पत्रद्वारे अध्यक्ष जयंटस ग्रुप ला बांधकाम परवानगी घेऊन प्रथम उद्यान विकसीत करण्याचे सुचविले होते परंतू अदयाप उध्यानाचे काम सुरू केलेले नाही म्हणुन जयंटस ग्रुप चा हेतू सदरील जगेवर उद्यान विकसीत करण्याचा नाही हे सिध्द होते म्हणून त्याचा भांडे करार रद्द करून उद्यान विकसीत करावे.

०५. सदरील ओपन स्पेस मध्ये पूर्वीपासूनच महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाचे ट्रान्सफ़ार्मर व मनपाची कचराकुंडी आहे व त्यांचे क्षेत्र एकूण ओपन स्पेसच्या दहा टक्कपेक्षा जस्त आहे. म्हणुन ते काढल्याशिवाय बांधकाम करणे पूणेपणे बेकायदेशीर होईल.

०६. जयंटस ग्रुप ऑफ़ चिकलठाणा यांना दिलेल्या बांधकाम परवानगी क्रमांक २६६/०५-०६ दिनांक ९/९/२००५ चे विपरीत जगेवर मंजूर नकाशाच्या विरूध्द बांधकाम सुरू केले असून सध्या प्लिन्थपर्यंतचे काम परवानगीपेक्षा जस्त क्षेत्राचे आहे म्हणून सदरील बांधकामावर म.प्रा. व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४३,५२,५४ व ५३ च्या प्रमाणे कायदेशीर कार्यवाही करून बांधकाम बंद करण्यात यावे ही नम्र विनंती .

०७. जयंटस ग्रुप ऑफ़ चिकलठाणा यांना दिलेल्या बांधकाम परवानगी मध्ये दिलेली अट क्रमांक १७ नूसार सदरील जगेवर असलेल्या विद्युत ट्रान्सफ़ार्मरला प्रत्यक्ष बांधकाम करणेपूर्वी जयंटस ग्रुप ऑफ़ चिकलठाणा ने संबंधीत विभागाकडुन काढुन घेणे आवश्यक होते व नगर बांधकाम सुरू करावे अशी अट असतांना अदयाप ट्रान्सफ़ार्मर काढले नाही म्हणून बांधकाम बंद करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे आक्षेप घेऊन देण्यात आलेली बांधकाम परवानगी रद्द करावी अशी विनंती केलेली आहे

**जयटंस ग्रुप यांनी जगेवरील बांधकाम परवानगीमध्ये** दर्शविण्यात आलेल्या स्थळ बदलून इतर ठिकाणी काही प्रमाणात जस्तीचे बांधकाम केलेले असल्यामुळे प्रशासकीय अधिकारी यांनी जयटंस ग्रुप यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम - ५४ अन्वये नोटीस बजवलेली आहे . तसेच आक्षेपक श्री देसरडा यांनी बांधकाम परवागनी रद्द करावी म्हणुन मा. उच्च

न्यायालयात **Write Petition No.** ६५७३/२००५ नूसार याचिका दाखल केली आहे . याच रिट पिटीशन मध्ये मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक १६/९/२००५ रोजी बांधकाम करण्यास स्थगीती दिली होती परतू दिनांक २०/१०/२००५ रोजी सदरील प्रकरणातील **Stay Vacate** केला आहे . परंतू सदरील आदेश पूढील अंमलबजवणीसाठी सुप्रीम कोर्टात जण्यासाठी पिटीशनरला **Stay** देण्यात आलेला आहे. त्यामुळे परवानगीनूसार **सद्य:स्थितीत प्रस्तावीत जगेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही असा अभिप्राय विधी सल्लागार यांनी दिलेला आहे .** सदर अभिप्रायानूसार मिळकतीवरील बांधकाम परवानगीस ज.क्र./मनपा/नरवि/२१४/०६ **दिनांक २७/०१/२००६ नूसार स्थगिती देण्यात आलेली आहे.**

प्रकरणात सदर जगा जयंटंस ग्रुप या संस्थेस लिजवर देण्यास काही भूखंड धारकांनी आक्षेप घेतला आहे. तसे पत्रही त्यांनी दिनांक १५/९/२००५ रोजी दिलेली आहे. मात्र दिनांक ०१/०२/२००६ ला संस्थेचे काही पदाधिकारी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन गेले व त्यांनी काही भूखंडधारकाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करून बांधकाम परवानगी पूर्ववत करण्याची मागणी केली आहे.

तरी शासन आदेशानूसार **रेखांकनातील खुल्या जगेवर त्या अभिन्यासातील भूखंडाधारकांचाच हक्क असतो** असे अभिप्रेत आहे . कारण भूखंडाधारकांनी त्यांच्या भूखंडक्षेत्राच्या प्रमाणात खुल्या जगेची किमत जमीन मालकास अदा केलेली असते . त्यानुषंगाने काही भूखंडधारकांनी रेखांकनातील खुल्या जगेवर जयटंस् ग्रुप यांना देण्यात आलेली बांधकाम परवानगी रद्द करून सदरील भाडेकरार रद्द करण्याबाबत पत्रान्वये विनंती केली आहे . व काही भूखंडाधारकांनी सदर बांधकाम करण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी अशा प्रकरणात धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

करीता अहवाल सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मुजेब खान : 'सदर जगा जयंटंस ग्रुप या संस्थेस लिजवर देण्यास काही भूखंड धारकांनी आक्षेप घेतला आहे. शासन आदेशानुसार रेखांकनातील खुल्या जगेवर त्या अभिन्यासातील भूखंडाधारकांचाच हक्क असतो असे अभिप्रेत' असल्याचे अहवालात स्पष्टपणे नमुद केलेले असल्याने सदरील भाडेकरार रद्द करण्यात यावा.

श्री.दिलीप गायकवाड : प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदरील देण्यात आलेली बांधकाम परवानगी चुकीची असल्याचे तसेच संबंधीत संस्थेने जगेवरील बांधकाम परवानगीमध्ये दर्शविण्यात आलेल्या स्थळ बदलून इतर ठिकाणी काही प्रमाणात जस्तीचे बांधकाम केलेले असल्यामुळे प्रशासकीय अधिकारी यांनी जयटंस ग्रुप यांना नोटीस बजवलेली आहे. या ले-आऊटमधील नागरीकांनी देखील तीव्र आक्षेप घेतलेला आहे. म्हणून सदरील भाडेकरार रद्द करण्यात यावा.

मा. सभापती : प्रशासनाने सादर केलेला अहवाल व त्यावर सभागृहात स.सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना रास्त आहेत. शासन आदेशानुसार रेखांकनातील खुल्या

जगेवर त्या अभिन्यासातील भूखंडाधारकांचाच हक्क असतो असे अभिप्रेत असल्याचे प्रशासनाचे मत आहे. त्यामुळे देण्यात आलेली बांधकाम परवानगी ही नियमबाह्य असल्याचे स्पष्ट होते. या सर्व बाबींचा विचार करता न.भू.क्र. १२४८३/१ बायजेपूरा या मिळकतीमधील रेखांकनातील (**Open Space**) क्षेत्र ५२७.९२ चौ.मी. १०% जगेवर जिम्नॅशियम हॉल बांधणे करीता जयंटस् ग्रुप ऑफ़ चिकलठाणा यांना भाडेतत्वावर दिलेल्या जगेचा भाडेकरार रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

अहवालात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार न.भू.क्र. १२४८३/१ बायजेपूरा येथील मंजूर रेखांकनातील (Open Space) वरील जयंटस् ग्रुप ऑफ चिकलठाणा या संस्थेस भाडेतत्वावर देण्यात आलेल्या जगेवरील बांधकाम परवानगी बाबत प्रशासनाकडून प्राप्त अहवाल पाहता शासन आदेशानुसार रेखांकनातील खुल्या जगेवर त्या अभिन्यासातील भूखंडाधारकांचाच हक्क असतो असे अभिप्रेत असल्याचे प्रशासनाचे मत आहे. तसेच अहवालात नमुद केल्यानुसार संबंधीत संस्थेकडून भाडेकरारातील अटींचा भंग झालेला आहे, म्हणून न.भू.क्र. १२४८३/१ बायजेपूरा या मिळकतीमधील रेखांकनातील (**Open Space**) क्षेत्र ५२७.९२ चौ.मी. १०% जगेवर जिम्नॅशियम हॉल बांधणे करीता जयंटस् ग्रुप ऑफ़ चिकलठाणा यांना भाडेतत्वावर दिलेल्या जगेचा भाडेकरार रद्द करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३१ :**

औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांतर्फे प्रतिवर्षी गणेशोत्सव, शिवजयंती तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरे करण्यात येतात. उत्सव साजरा करण्यासाठी प्रतिवर्षी गणेशोत्सवास २५०००/- आणि शिवजयंती व डॉ.आंबेडकर जयंतीच्या प्रत्येक उत्सवास रू.१०,०००/- रक्कम मनपा फंडातून उपलब्ध करून देण्यात यावी. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : दिलीप गायकवाड अनुमोदकः मिलींद दाभाडे, साहेबराव कावडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांतर्फे प्रतिवर्षी गणेशोत्सव, शिवजयंती तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्यासाठी प्रतिवर्षी गणेशोत्सवास २५०००/- आणि शिवजयंती व डॉ.आंबेडकर जयंतीच्या प्रत्येक उत्सवास रू.१०,०००/- रक्कम मनपा फंडातून उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३२ :**

कार्यकारी अभियंता (वि.ड्र.इ.व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा गरवारे क्रिडा संकुल येथे जलतरण तलाव बांधण्याच्या कामाचे आवश्यक असलेले अंदाजपत्रक, नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी तयार करण्याकरीता सदरील प्रकारच्या कामाचा अनुभव असलेले श्री.एन.जी.कारखाने अँड असोसिएटस् (कन्सल्टींग स्ट्रक्चरल इंजिनियर) यांची नेमणुक सदरील

प्रकल्पाच्या एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५०% फिस देणेस्तव मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मनपा गरवारे क्रिडा संकुल येथे जलतरण तलाव बांधणेस्तव (कन्सल्टींग स्ट्रक्चरल इंजिनियर) श्री.एन.जी.कारखाने अँड असोसिएटस् यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक, सविस्तर नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी कामे सदरील कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५०% फिस अदा करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा गरवारे क्रिडा संकुल येथे जलतरण तलाव बांधण्याच्या कामाचे आवश्यक असलेले अंदाजपत्रक, नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी तयार करण्याकरीता अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असलेले श्री.एन.जी.कारखाने अँड असोसिएटस् (कन्सल्टींग स्ट्रक्चरल इंजिनियर) यांची नेमणुक करून सदरील प्रकल्पाच्या एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५०% फिस अदा करून सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३३३ :</u>**

कार्यकारी अभियंता (वि.ड्रे.इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मुख्य अग्निशमन दल, पदमपुरा येथे अस्तित्वातील इमारतीवर आपतकालीन व्यवस्थापन अंतर्गत अतिरिक्त मजल्याची वाढ करणे या कामास्तव आवश्यक असलेले अंदाजपत्रक, नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी तयार करण्याकरीता सदरील प्रकारच्या कामाचे अनुभव असलेले वास्तु विशारद श्री.मनिष काळे अँड असोसिएटस् यांची नेमणुक सदरील प्रकल्पाच्या एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५०% फीस देणेस्तव मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मुख्य अग्निशमन दल पदमपुरा येथे अस्तित्वातील इमारतीवर आपत्कालीन व्यवस्थापन अंतर्गत अतिरिक्त मजल्यांची वाढ करणे या कामास्तव वास्तु विशारद श्री.मनिष काळे अँड असोसिएटस् यांच्याकडून सविस्तर अंदाजपत्रक, सविस्तर नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी कामे सदरील कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५०% फीस अदा करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य अग्निशमन दल, पदमपुरा येथे अस्तित्वातील इमारतीवर आपतकालीन व्यवस्थापन अंतर्गत अतिरिक्त मजल्याची वाढ करणे या कामास्तव आवश्यक असलेले अंदाजपत्रक, नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी तयार करण्याकरीता अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असलेले वास्तु विशारद श्री.मनिष काळे अँड असोसिएटस् यांची नेमणुक करून सदरील प्रकल्पाच्या एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५०% फीस अदा करून सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३३४ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरू बाल उद्यान, दिल्लीगेट येथे स्व.राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार र.रू.९,९९,६००/- चे अंदाजपत्रक

तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. सदरील कामाचे भुमीपुजन लवकरच मा.मुख्यमंत्री यांचे हस्ते करण्यात येणार असल्याने शहरातील कुशल शिल्पकार श्री.सुनील देवरे यांचे कोटेशन सर्वात कमी दराचे असल्याने त्यांचे मार्फत काम करून घेण्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे व मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी आदेशित केलेले आहे.

तरी सदरील काम शिल्पकार श्री.सुनील देवरे यांचेकडून करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरू बाल उद्यान, दिल्लीगेट येथे स्व.राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याच्या कामासाठी तयार केलेले र.रू.९,९९,६००/- चे अंदाजपत्रकास तसेच पुतळा उभारणीचे काम शहरातील कुशल शिल्पकार श्री.सुनील देवरे यांचे मार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३५ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.इ.व उ.बां.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-८ येथे बॉटनिकल उद्यान विकसित करणेकरीता सदरील ठिकाणचे प्लॅनिंग, लॅन्डस्केपींग, सविस्तर नकाशे व अंदाजपत्रक इत्यादी तयार करणे करीता अनुभवी उपलब्ध वास्तु विशारद मार्फत सदरील कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २% फीस देऊन प्लॅनिंग, लॅन्डस्केपींग, सविस्तर नकाशे व अंदाजपत्रक इत्यादी कामे करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-८ येथे बॉटनिकल उद्यान विकसित करणेकरीता सदरील ठिकाणचे प्लॅनिंग, लॅन्डस्केपींग, सविस्तर नकाशे व अंदाजपत्रक इत्यादी तयार करणे करीता अनुभवी उपलब्ध वास्तु विशारद मार्फत सदरील कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २% फीस देऊन काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३६ :**

प्रस्तावसादर करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मो.मुकुंदवाडी व संतोषी माता नगर वस्तीलगतच्या नाल्यास नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.२९,९५,१५०/- चे सन २००४-०५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्तांनी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.१६.१.२००६ रोजे मंजुरी दिल्यानुसार सर्वसाधारण सभा दिनांक २०.१.२००६ ठराव क्र.१५९/५ अन्वये अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे.

उपरोक्त प्रमाणे मान्यता झाल्यानुसार निविदा सुचना ज.क्र.मनपा/लेखा/निविदा/१०४/२००६ दि.२३.२.२००६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच ३.३.२००६ पर्यंत १४ कोऱ्या निविदा विक्री झाल्या आणि निविदा सादरीकरणाच्या दिवशी म्हणजेच ९.३.२००६ रोजे दर भरलेल्या एकूण सात निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन | १९.२२२% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| २ | मे.शहा कन्स्ट्रक्शन | १९.१९% कमी दराने |
| ३ | स. समीउद्यीन | १४.९९% कमी दराने |
| ४ | मो. सोहेल सिद्यीकी | १४.८६% कमी दराने |
| ५ | एस.के. कन्स्ट्रक्शन | १४.५८% कमी दराने |
| ६ | अमन असोसिएटस् | १२.५१% कमी दराने |
| ७ | रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | १२.२५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आणि अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२२२% कमी दराची मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. त्यास मा.आयुक्तांची दि.३१.२.२००६ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. प्रस्तुत कामाचा खर्च दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्राप्त शासकीय निधीतून करण्यात येणार आहे. तरी मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा १९.२२२% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मो.मुकुंदवाडी व संतोषी माता नगर वस्तीलगतच्या नाल्यास नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२२२% कमी दराची मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३७ :**

मा. आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र तसेच कार्यकक्षा दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक प्रकारच्या कामासाठी नागरीकांचा महानगरपालिकेशी थेट संबंध येतो. नागरी मुलभूत सुविधा बरोबरच अनेक प्रकारचे परवाने, ना हरकत प्रमाणपत्र, जन्ममृत्यू प्रमाणपत्र, बांधकाम परवानग्या, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र आदि प्रकारचे परवाने/प्रमाणपत्र महानगरपालिकेतर्फे दिले जतात. तसेच वेळोवेळी त्यांचे नुतनीकरण केले जते. सद्य:स्थितीत अशा प्रकारची कामे मुख्यत: महापालिका मुख्यालयातून केली जतात. यासाठी नागरीकांना महापालिका मुख्य कार्यालय तसेच वॉर्ड कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. अशा प्रकारची कामे एखाद्या संस्थेस दिल्यास महापालिकेवरील कामाचा ताण कमी होवू शकतो. विविध प्रकारचे परवाने, प्रमाणपत्र इत्यादी बाबी नागरीकांना त्यांच्या निवासस्थानी पुरविल्यास नागरीकांच्या वेळेची व आर्थिक बचत होवू शकते. तसेच जे नागरीक वेळेअभावी महापालिकेशी संपर्क साधु शकत नाही त्यांच्यासाठीही मोठी उपलब्धता असेल. यासाठी ‘एएमसी ॲट होम’ ही संकल्पना राबविण्याचा मनपा प्रशासनाचा मानस आहे. अशा प्रकारचे काम करण्याची तयारी मे. सारंग एंटरप्रायझेस यांनी दर्शविलेली आहे. सदरचे काम खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मे.सारंग एंटरप्रायझेस यांना देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**अटी व शर्ती :**

१. महापालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या परवानग्या, परवाने, प्रमाणपत्र, ना हरकत प्रमाणपत्र आदीची माहिती, कार्यपध्दती व संबंधीत विभाग याची सविस्तर माहिती मनपा प्रशासन संबंधीत संस्थेस उपलब्ध करून देईल.

२. यासाठी आवश्यक असणारे नमुना प्रपत्र महानगरपालिका संस्थेस पुरवेल.

३. संस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवे बाबतची माहिती मनपा प्रसिध्दी माध्यमाद्वारे नागरीकांना देईल.

४. नागरीकांच्या विनंती वरून संस्थेचे प्रतिनिधी संबंधीतास हव्या असलेल्या परवाना इत्यादी बाबतची माहिती घेवुन संबंधीताच्या घरी जवुन भरून घेतील. आवश्यक असल्यास पुरक कागदपत्रे हस्तगत करतील व ते प्रपत्र महापालिकेच्या संबंधित विभागाकडे सादर करतील. यासाठी संस्था संबंधिताकडून रू.५०/- एवढे शुल्क वसूल करेल.

५. संबंधीतास परवाने आदी बाबी त्यांच्या निवासस्थानी संस्थेमार्फतच द्यावयाची असल्यास त्यासाठी संस्था रू.२५/- शुल्क आकारेल व महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडून परवाने आदी बाबी हस्तगत करून अर्जदारास पोहचती करेल.

६. कागदपत्रांची पूर्तता अथवा इतर कोणत्याही कारणाने अर्जदाराशी पुन्हा संपर्क साधणे आवश्यक असल्यास त्यासाठीप्रती भेटीस संस्था रू.२५/- शुल्क आकारेल.

७. उक्त कामासाठी संस्थैने आकारलेल्या शुल्कावर संस्थेचाच अधिकार राहील.

८. संस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधाची जहिरात महापालिका स्वत: करेल.

९. सदरील कामासाठी संस्थेने स्वत:चे कार्यालय व आवश्यक फर्निचर, कर्मचारी इत्यादी सुविधा स्वखर्चाने उपलब्ध करून घ्याव्यात यासाठी महापालिका कोणताही खर्च करणार नाही.

१०. संस्थेने सादर केलेले प्रस्तावांवर निर्धारीत वेळेत महापालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येईल. तथापि काही अपरिहार्य कारणामुळे प्रकरण निकाली काढण्यात विलंब होत असल्यास त्याची कल्पना कारणासह मनपातर्फे संस्थैस देण्यात येईल.

११. उक्त अटी व शर्तीमध्ये आवश्यकता वाटल्यास मनपा प्रशासन बदल करू शकेल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे दिले जणारे अनेक प्रकारचे परवाने, ना हरकत प्रमाणपत्र, जन्ममृत्यू प्रमाणपत्र, बांधकाम परवानग्या, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र आदि प्रकारचे परवाने/प्रमाणपत्र देणे तसेच वेळोवेळी त्यांचे नुतनीकरण करणे अशा प्रकारची कामे करण्यासाठी 'एएमसी ॲट होम' ही संकल्पना राबविण्यास व सदरील काम प्रस्तावात नमूद अटी-शर्तीस अधीन राहून मे.सारंग एंटरप्रायझेस यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३३८ :</u>**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेकडे सन २००५-०६ या आर्थिक वर्षात रू.२५.०० कोटी शासकीय अनुदान व रू.१५.०० कोटी सिडको हस्तांतरणाचे अनुदान प्राप्त झालेले आहेत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्ज एक रक्कमी भरण्याकरिता महानगरपालिकेने युनायटेड वेस्टर्न बँकेकडून रू.२८.०० कोटीचे कर्ज घेतलेले असून सदरील कर्ज एक रक्कमी भरणा केल्यानंतर महानगरपालिकेस कर्ज व्याज माफीनंतर रू.४१.८८ कोटी भरणा करणे होते. त्यापैकी रू.३३.७८ हे महानगरपालिकेने दि.३१.३.२००६ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे जमा केलेले आहेत. उर्वरित रक्कम ३१ ऑगस्ट २००६ रोजी भरणा करावयाचा आहे. तथापि बँकेसोबत झालेल्या पत्र व्यवहारानुसार प्रारंभिक देणे हे रू.२८.०० कोटी होते.

त्याचे अंतिम पडताळणीनंतर सदरील रक्कम ही उपरोक्तनुसार भरणा करावयाची होती. परंतु बँकेने सदरील उर्वरित रक्कम बँकेकडे ३१ ऑगस्टपर्यंत अनामत ठेवणे आवश्यक असल्याचे म्हटल्याप्रमाणे सदरील अनुदानातील रक्कमेतून रू.७.१२ कोटी अनामत ठेवण्यात येत असून सदरील रक्कम अदा करतांना महानगरपालिका फंडातून जमा करण्यात येईल. करिता रू.७.१२ कोटी युनायटेड वेस्टर्न बँकेमध्ये अनामत ठेवण्यास मान्यता देणे योग्य तसेच कर्जचे खाते हे ऐलीÍ असल्याने मासिक हप्त्याचे देय इतके तीन महिन्याचे अनामत रू.१.३० कोटी बँकेकडे अनामत करण्यात आलेले आहे.

वरील दोन्ही रक्कमा वज जता उर्वरित रक्कम राष्ट्रीय अथवा शेड्युल्ड बँकेपैकी जी बँक जस्त व्याज दर देईल त्यांच्याकडे अनामत ठेवण्यास मान्यता देणे योग्य, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेकडे सन २००५-०६ या आर्थिक प्राप्त झालेल्या शासकीय अनुदान व सिडको हस्तांतरण अनुदानातून प्राप्त झालेल्या रक्कमेतून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्ज एक रक्कमी भरणा केल्यानंतर उर्वरीत अनुदानातील रक्कमेतून रू.७.१२ कोटी व मासिक हप्त्याचे देय इतके तीन महिन्याचे अनामत रू.१.३० कोटी युनायटेड वेटर्न बँकेमध्ये अनामत ठेवण्यास मान्यता देण्यात येते. तसेच वरील दोन्ही रक्कमा वज जता उर्वरित रक्कम राष्ट्रीय अथवा शेड्युल्ड बँकेपैकी जी बँक जस्त व्याज दर देईल त्यांच्याकडे प्रथम सहा महिन्यांसाठी अनामत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती** : आजची सभा ही या सभागृहाची शेवटची सभा आहे. गेल्या ११ महिन्यांच्या कालावधीत सर्वांनी सहकार्य केले, प्रशासनाची देखील सहकार्याची भावना होती. आपण सर्वांनी केलेले सहकार्य मी विसरू शकणार नाही. जनतेच्या आपल्याबद्दलच्या काम करण्यासंबंधी ज्या अपेक्षा आहेत त्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. सर्वांनी मला सहमतीने या पदावर बसविले त्या सर्वांचे ऋणनिर्देश व्यक्त करतो. वेळोवेळी स.सदस्यांनी केलेल्या सूचनांनुसार अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य केले. मनपाच्या हिताचे निर्णय घेण्यास्तव विश्वासपात्र प्रयत्न केले त्यात सर्वांचे सहकार्य मिळाले. स्थायी समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, मा. आयुक्त, उप आयुक्त, मनपाचे सर्व अधिकारी, सर्व पत्रकार बांधव तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधी या सर्वांचे लेखी स्वरूपात व आवाहनात्मक ऋण व्यक्त करतो व आजची सभा संपल्याचे जाहीर करतो.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद